गुरुवार, २१ जुलै २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

राज्य आपत्ती व्यवस्थापन संचालकपदी धुळाज/२
अलिबाग समुद्र किनाऱ्याचा बंधारा उखडला/७
पॉवरलिफ्टिंगमध्ये रायगडच्या तिघांना विजेतेपद/८

### मंत्रिमंडळ विस्तारासाठी कायदेशीर अडचण नाही : मुख्यमंत्री



**मुंबई :** आमचे सरकार वैध असून लोकशाहीत बहुमताला आणि आकड्यांना महत्त्व आहे. मंत्रिमंडळ विस्तारासाठी न्यायालयाची काहीही अडचण नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. राज्याच्या दृष्टीने बुधवारी (दि. २०) सर्वोच्च न्यायालयात दोन महत्त्वपूर्ण बाबींवर सुनावणी झाली. त्यामध्ये राज्याच्या सत्तांतरणाचा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा होता. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर महाराष्ट्राला दिलासा दिला, तर सरकारसंदर्भातील याचिकांवरील सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. यानंतर मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ओबीसी आरक्षणासाठी आमच्या सरकारचा पायगुण चांगला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे आपण आभारी असून ओबीसी आरक्षणासाठी लढा देणाऱ्यांचा विजय झाला आहे. ओबीसी आरक्षणाचे श्रेय आम्हाला घ्यायचे नसून याचे श्रेय ओबीसींसाठी लढा देणाऱ्यांचे आहे.

# ओबीसी आरक्षणाचा मार्ग मोकळा

## सर्वोच्च न्यायालयाचा महाराष्ट्रासाठी मोठा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्यातील ओबीसी आरक्षणाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (दि. २०) झालेल्या सुनावणीत बांठिया आयोगाचा अहवाल मान्य केला असून या अहवालानुसार येत्या दोन आठवड्यांत निवडणूक कार्यक्रम जाहीर करा, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत.

राज्य सरकारच्या सूचनेनुसार जयंतकुमार बांठिया आयोगाने त्यांच्या अहवालामध्ये ओबीसींना स्थानिक स्वराज संस्थांमध्ये २७ टक्क्यांपर्यंत आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस केली होती. कोर्टाने हा अहवाल मान्य केल्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना २७ टक्के राजकीय आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील ९२ नगर परिषदा आणि चार नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ८ जुलै रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता, मात्र त्यानंतर या निवडणुका स्थगित



करण्याचा निर्णय घेतला गेला. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे सचिव संजय सावंत यांनी पत्रकदेखील जारी केले होते.

### दोन आठवड्यांत निवडणुका जाहीर करण्याचे आदेश

त्यानंतर बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने दोन आठवड्यांत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत.

ओबीसी आरक्षणासाठी बांठिया आयोगाने इम्पिरिकल डेटा सर्वोच्च न्यायालयात सादर केला होता तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार ट्रीपल टेस्टची पूर्ततादेखील करण्यात आली. त्यामुळे मध्य प्रदेशाप्रमाणे महाराष्ट्रातदेखील ओबीसी आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.



**ओबीसी राजकीय आरक्षणाचा आमच्या महायुती सरकारने दिलेला शब्द पाळला! मा. सर्वोच्च न्यायालयातून ओबीसी राजकीय आरक्षणाला मान्यता मिळणे हा संपूर्ण ओबीसी समाजाचा विजय आहे. ओबीसी कल्याण, बहुजन कल्याण, गरीब कल्याण हाच आमचा अजेंडा होता, आहे आणि राहील. ओबीसी राजकीय आरक्षण प्राप्त करून देण्याच्या प्रक्रियेतील सहभागी सर्वांचे मन:पूर्वक आभार!**

**–देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**


### ‘ओबीसी आरक्षणासाठी शिंदे-फडणवीस सरकार यावे लागले’

**मुंबई :** ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर ओबीसी नेते आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ओबीसी आरक्षणाची लढाई आम्ही जिंकलो आहोत, मात्र यासाठी उद्धव ठाकरे आणि अजित पवार सरकार जाऊन एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस सरकार यावे लागले. यासाठी योग्य पद्धतीने हाताळणी आणि चांगले वकील देणे महत्त्वाचे होते. मी आधीच सांगितले होते की, ओबीसी आरक्षण केवळ देवेंद्र फडणवीस मिळवून देऊ शकतात. तेच झाले. त्यांच्यासह आम्ही केलेल्या संघर्षामुळे आरक्षण मिळाल्याचे आमदार बावनकुळे यांनी नमूद केले.




**ओबीसी आरक्षणाच्या निर्णयाचे स्वागत, स्वागत, स्वागत. आतुरतेने प्रतीक्षा करणाऱ्या समस्त ओबीसींना न्याय मिळाला आहे. या निर्णयाने ओबीसींच्या राजकीय भविष्यावरील टांगती तलवार दूर झाली. सरकारचे आभार आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करते.**

**–पंकजा मुंडे,** ओबीसी नेत्या



**मागील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाविना झाल्या. या पापाला तेव्हाचे महाविकास आघाडी सरकार जबाबदार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच ओबीसी समाजाला न्याय मिळाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी आरक्षण मिळवून दिल्याबद्दल त्यांचे आभार!**

**–आमदार प्रशांत ठाकूर,** अध्यक्ष, भाजप उत्तर रायगड जिल्हा



**राज्यातील ओबीसीवर्गाला २७ टक्के आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. आजच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे ओबीसींच्या राजकीय भवितव्यावरील अरिष्ट दूर झाले आहे. आम्ही या निर्णयाचे स्वागत करतो. सर्व ओबीसी बंधू-भगिनींचे मनापासून अभिनंदन!**

**–प्रकाश शेंडगे,** अध्यक्ष, ओबीसी जनमोर्चा

## राज्यातील राजकीय पेचाबाबत आता १ ऑगस्टला पुढील सुनावणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्यातील राजकीय पेचप्रसंगाबाबत झालेल्या याचिकेची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंना आपले मुद्दे मांडण्यासाठी पुढील बुधवारपर्यंत (२७ जुलै) वेळ दिला असून प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सोबतच काही मुद्दे आवश्यक वाटल्यास प्रकरण विस्तारित खंडपीठ किंवा घटनापीठाकडे सोपवण्याची गरज आहे का यासंबंधी विचार केला जाईल, असेही कोर्टाने नमूद केले आहे.

सर्वोच्च न्यायलयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेसंदर्भात सरन्यायाधीश एन. व्ही. रमण, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी आणि न्यायमूर्ती हिमा कोहली यांच्या त्रिसदस्यीय पीठापुढे सुनावणी झाली. शिंदे गटाची बाजू ज्येष्ठ वकील हरिश साळवे यांनी मांडली, तर उद्धव ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक मनू सिंघवी यांनी युक्तिवाद केला. या वेळी दोन्ही



पक्षांच्या बाजू ऐकून घेतल्यानंतर पुढील बुधवारपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले, तर पुढील सुनावणी १ ऑगस्ट रोजी होईल, असे स्पष्ट केले.

न्यायालयाने ही सुनावणी पुढे ढकलल्याने मंत्रिमंडळाचा विस्तार नेमका कधी होणार या प्रश्नावर बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, लवकरच आम्ही मंत्रिमंडळ विस्तार करू, असे पत्रकारांशी बोलताना सांगितले. न्यायालयीन प्रक्रिया आणि मंत्रिमंडळ विस्ताराचा काहीही संबंध नाही. राष्ट्रपतिपदाची निवडणूक होती. त्यात बऱ्याच गोष्टी होत्या, परंतु आता लवकरात लवकर मंत्रिमंडळ विस्तार होईल, असे ते म्हणाले.


### कर्नाळा बँक घोटाळा प्रकरण

## विवेक पाटलांवर आता सीआयडीचाही खटला

**▪ पुढील सुनावणी २८ जुलैला**

**पनवेल : प्रतिनिधी**

कोट्यवधी रुपयांच्या कर्नाळा बँक घोटाळाप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असलेले बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांना आता सीआयडीच्या कोर्टवारीलाही सामोरे जावे लागत आहे. याबाबतची पुढील




सुनावणी २८ जुलैला होणार आहे.

कर्नाळा बँकेतील सुमारे ५५० कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी ईडीने दाखल केलेल्या खटल्यात घोटाळ्याचे सूत्रधार विवेक पाटील यांना सत्र न्यायालयात जामीन मिळू शकलेला नाही. आता राज्याच्या सीआयडीनेही पुन्हा विवेक पाटील यांच्याविरुद्ध खटला दाखल केला आहे. या खटल्याची सुनावणी पनवेल कोर्टात सुरू झाली आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### रानिल विक्रमसिंघे श्रीलंकेचे नवे राष्ट्रपती



**कोलंबो :** श्रीलंकेत बुधवारी (दि. २०) झालेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत काळजीवाहू राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे निवडून आले आहेत. मागील ४४ वर्षांत प्रथमच श्रीलंकेच्या संसदेत राष्ट्रपतिपदासाठी निवडणूक घेण्यात आली. राष्ट्रपती गोताबया राजपक्षे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने तत्कालीन पंतप्रधान विक्रमसिंघे यांनी काळजीवाहू राष्ट्रपती म्हणून पदभार स्वीकारला होता.

### बॉलीवूड निर्माती प्रेरणा अरोराला ईडीकडून अटक

**मुंबई :** आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी बॉलीवूडमधील प्रसिद्ध निर्मात्या प्रेरणा अरोरा यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केली आहे. त्यांनी यापूर्वी आठ महिन्यांचा तुरुंगवास भोगला आहे. त्यानंतर आता त्यांच्यावर नव्याने गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांची चौकशी सुरू होणार आहे.



## पनवेल शिवसेनेतही पडली फूट

### अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातही शिवसेनेत उभी फूट पडली असून सुमारे चारशे पदाधिकारी व शिवसैनिक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सहभागी झाले आहेत. या सर्वांनी बुधवारी (दि. २०) मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन आपला पाठिंबा दर्शविला.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावर घेतलेल्या भूमिकेला राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे. त्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे पनवेल महानगर संघटक व माजी नगरसेवक अ‍ॅड. प्रथमेश सोमण यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेण्यासाठी दुपारी रवाना झाले. तत्पूर्वी त्यांनी पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार घालून मुख्यमंत्री शिंदे यांच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या.

## नवी मुंबईतील गवते दामत्याने समर्थकांसह घेतली उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या दिघा भागातील मातब्बर माजी नगरसेवक नवीन गवते, माजी नगरसेविका अपर्णा गवते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता पक्षात स्वगृही प्रवेश केला. त्यांनी बुधवारी (दि. २०) माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली.

या वेळी माजी नगरसेवक विकास झंजाड, परिवहन समितीचे माजी उपसभापती वीरेश सिंह, अथर्व गवते, माजी प्रभाग समिती सदस्य दामोदर कोटियन हेही उपस्थित होते. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वांना शुभेच्छा देत भारतीय जनता पक्षामध्ये त्यांचा यथोचित सन्मान केला जाईल, असे आश्वस्त केले.



संजीव नाईक आणि संदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली नवीन गवते यांनी या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना दिघा येथील समस्या सोडविण्यासाठी निवेदन दिले. झोपडपट्ट्यांचा विकास आणि गरीब-गरजू नागरिक राहत असलेल्या घरांना संरक्षण देण्याची मागणी प्रामुख्याने यामध्ये करण्यात आली आहे. दिघा भागातील प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार गणेश नाईक यांच्या विकासाभिमुख आणि लोककल्याणकारी नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपत घरवापसी केल्याची प्रतिक्रिया नवीन गवते यांनी दिली. दिघा विभागाचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असून भाजपच्या माध्यमातून हे उद्दिष्ट निश्चित साध्य होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

## चिरले-खालापूर रस्त्याचा बृहद आराखडा तीन महिन्यांत होणार सादर

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील चिरले-खालापूरदरम्यान रस्ता बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा बृहद आराखडा तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून आराखड्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. पुढील तीन महिन्यांत आराखडा पूर्ण होण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि नवी मुंबईतील अंतर कमी करण्यासाठी सागरी सेतूची उभारणी करण्यात येत आहे. या सागरी सेतूमुळे मुंबई ते चिरले प्रवास वेगवान होणार आहे. चिरलेवरून पुढे पुण्याला राष्ट्रीय



महामार्गावरून जावे लागणार असून हे अंतर बरेच मोठे आहे. त्यामुळे चिरलेवरून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पोहचण्यासाठी सागरी सेतू थेट मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला जोडण्याचा निर्णय एमएमआरडीएकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार चिरले ते खालापूर असा ६.५ किमी लांबीचा रस्ता बांधण्यात येणार आहे. यातील १.५ किमीचा रस्ता पूर्णतः नवीन असणार आहे.

या प्रकल्पाचा बृहद आराखडा तयार करण्यासाठी एमएमआरडीएने प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करण्याचा निर्णय घेत निविदा मागविल्या होत्या. या कामासाठी एकूण आठ निविदा सादर झाल्या होत्या. यापैकी तीन निविदा पात्र ठरल्या. यापैकी एकाची निवड करून संबंधित कंपनीला कंत्राट देण्यात आल्याची माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. टेक्नोजेन कन्सल्टंट कंपनीला हे काम देण्यात आले असून आराखडा तयार करण्याचे काम सुरू करण्यात असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. कंपनीला तीन महिन्यांत आराखडा तयार करावा लागणार आहे. आराखडा सादर झाल्यानंतर त्याला मंजुरी घेऊन रस्त्याच्या बांधकामासाठी निविदा काढण्यात येणार आहेत.

## चंद्रपुरात २६०० पूरग्रस्तांचे स्थलांतर

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

राज्यात सध्या अनेक ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे. या पावसामुळे २८ जिल्हे व २८९ गावे प्रभावित झाली असून चंद्रपूर जिल्ह्यात वर्धा नदीच्या पात्रात पाण्याची पातळी वाढत असल्याने दोन हजार ६०० नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर करण्यात आले आहे.

लष्कराचे एक पथक, एनडीआरएफचे एक पथक, एसडीआरएफच्या दोन टीम व स्थानिक टीमच्या सहाय्याने वर्धा नदी पात्रालगतच्या गावातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात येत आहे.

दरम्यान, राज्यात पुरामुळे २८ जिल्हे व २८९ गावे प्रभावित झाली असून ८३ तात्पुरती निवारा केंद्र तयार करण्यात आली आहे. आतापर्यंत १४ हजार ४८० नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. अतिवृष्टीमुळे १०९ नागरिकांनी आपला जीव गमावला, तर १८९ प्राणी दगावले आहेत. पावसामुळे आतापर्यंत ४४ घरांचे पूर्णतः आणि २०८६ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे.

### डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानची बांधिलकी

## रायगड जिल्हा पोलीस कल्याण निधीस सात लाखांचा धनादेश सुपूर्द

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रबोधनाबरोबरच समाजसेवा करणाऱ्या डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने रायगड जिल्हा पोलीस कल्याण निधीकरिता ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या हस्ते सात लाखांचा धनादेश बुधवारी (दि. २०) रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

रेवदंडा येथे झालेल्या या कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे, रायगडभूषण डॉ. सचिन धर्माधिकारी, उमेश धर्माधिकारी, राहुल धर्माधिकारी



उपस्थित होते.

याबाबत माहिती देताना रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी सांगितले की, डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून रायगड जिल्हा पोलीस कल्याण निधीकरिता सात लाख रुपयांचा धनादेश प्राप्त झाला आहे. या रकमेचा विनीयोग जिल्ह्यातील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी केला जाईल. रायगड जिल्हा पोलीस दल आणि त्यांच्या कुटुंबीयांतर्फे डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे मनःपूर्वक आभार!

# नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

## पूरग्रस्तांना दिलासा देण्याचे मुख्यमंत्री शिंदेंचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसामुळे वारंवार येणारा पुराचा धोका लक्षात घेता पूर नियंत्रणाचा भाग म्हणून नदीपात्रातील वाळू व गाळ काढण्यासाठी शास्त्रशुध्द कार्यक्रम जलसंपदा विभागाने आखण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले तसेच पूरग्रस्त भागात झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

मंत्रालयातील समिती कक्षात राज्यातील गडचिरोली, वर्धा, यवतमाळ व चंद्रपूर येथील पूरग्रस्त भागात झालेल्या नुकसानीबाबत आढावा बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भुषण गगराणी, अपर मुख्य सचिव (गृह) आनंद लिमये, अपर मुख्य सचिव (बांधकाम) मनोज सौनिक, अपर मुख्य सचिव (महसूल) नितीन करीर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधानसचिव असिम कुमार गुप्ता, प्रधान सचिव विकास खारगे, प्रधान सचिव पाणीपुरवठा तथा पालकसचिव यवतमाळ संजीव जयस्वाल, प्रधानसचिव (ऊर्जा) दिनेश वाघमारे, प्रधान सचिव (कृषी) एकनाथ डवले, चंद्रपूरचे पालकसचिव तथा अपर मुख्य सचिव (सहकार) अनुपकुमार, पालक सचिव वर्धा तथा अपर मुख्य सचिव (अल्पसंख्यांक) जयश्री मुखर्जी, गडचिरोलीचे पालक सचिव तथा गृहनिर्माणचे प्रधानसचिव मिलींद म्हैसकर, एनडीआरएफचे कमांडट आशिष कुमार,एसडीआरएफचे अतिरिक्त महासंचालक चिरंजीव प्रसाद, विभागीय आयुक्त अमरावती, नागपूर तसेच गडचिरोली, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक या वेळी दूरदृश्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पूरग्रस्त भागात पूरामुळे ज्या नागरिकांचा मृत्यू ओढवला त्यांच्या नातेवाईकांना तत्काळ मदत वितरीत झाली आहे,तरीही जे लोक या आपत्तीत जखमी असून उपचार घेत आहेत, त्यांच्यावर उपचारदेखील वेळेत होण्याबाबत खबरदारी घेण्यात यावी. पूरग्रस्त भागातील शेती तसेच इतर नुकसानीचे पंचनामे तत्काळ करून त्याचे प्रस्ताव शासनाला सादर करावेत. कोणताही आपत्तीग्रस्त मदतीपासून वंचित राहता कामा नये याची खबरदारी प्रशासकीय यंत्रणांनी घ्यावी. राज्यात पावसामुळे झालेल्या १०९ मृत्यूपैकी ६० टक्के मृत्यू हे वीज पडून झालेले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात अंगावर वीज पडून मृत्यू होवू नयेत यासाठी वीज अटकाव यंत्रणादेखील प्रभावीपणे राबविण्यासाठी तज्ज्ञ समितीच्या शिफारशीनुसार मदत व पुनर्वसन विभागाने काम करावे अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी बैठकीत केल्या. यावेळी जिल्ह्यातील पूरस्थिती तसेच मदत व बचावकार्याची सविस्तर माहिती बैठकीत देण्यात आली.

## राज्य आपत्ती व्यवस्थापन संचालकपदी धुळाज

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील नैसर्गिक आपत्तीवर लक्ष ठेवून वेळीच मदतकार्य पोहोचविण्यात महत्त्वाचा दुवा म्हणून काम करणाऱ्या राज्य आपत्ती व्यवस्थापन संचालनालयाला अखेर तब्बल सात महिन्यांनंतर पूर्णवेळ संचालक मिळाला असून आप्पासाहेब धुळाज यांची या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

पाऊस, दुष्काळ तसेच आपत्तीच्या काळात आपत्ती व्यवस्थापन संचालनालयावर मोठी जबाबदारी असते. राज्यातील कोणत्याही विभागात, जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची आपत्ती आली तर त्या ठिकाणी तातडीने मदत पोहोचविण्याचे, त्यासाठी संबधित यंत्रणांमध्ये समन्वय साधण्याचे काम राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन संचालनालयाकडून होते. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन विभागाशी संपर्क ठेवणे, त्यांना आवश्यक मदत पुरविणे, राज्य सरकारला आपत्तीची माहिती देणे, केंद्राशी समन्वय ठेवणे आदी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या संचालकांना सांभाळाव्या लागतात. मात्र या महत्त्वाच्या पदावरील एल. एस. माळी यांच्या बदलीनंतर २१ डिसेंबरपासून संचालनालयाचा कारभार अतिरिक्त कार्यभारावर सुरू आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E.H.V. Civil Const. cum Maint. Division, Panvel**
**SRM e-Tender Notice No. 03/2022-23**

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| Rfx No. | Name of work | Estimated Cost in Rs. |
|---|---|---|
| 7000024067 | Repairing RCC compound wall, concrete platform and providing rolling shutter at Major Store Bhingari Panvel. | 1915245.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in.**
**Contact person:** Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325

**Executive Engineer (Civil), Panvel**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-29/22-23 7000023966 | Work of LILO arrangement of 100kV Jite – Thal-Gail Tap line at 100kV Gail S/stn under EHV (O&M) Dn. Panvel. | Rs. 218.99 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 5000/-+ GST Submission of bids from 20.07.2022 to 27.07.2022 up to 23:59:00 hrs, Opening date:-28.07.2022 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8356921558 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


## पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आता ई-साहित्याची निर्मिती

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची गणित या विषयातील संपादणूक वाढण्यासाठी विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेकडून गणिताचे ई साहित्य विकसित करण्यात येत असून, हे साहित्य दिक्षा ॲप, युट्यूब वाहिनीसह विविध माध्यमांद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

गणिताचे ई साहित्य निर्माण करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून प्रशासकीय आणि १६.५० लाखांच्या निधी मान्यतेसंदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. राज्यात दीक्षा ॲपचा वापर अधिक प्रभावी पद्धतीने होण्याच्या दृष्टीने मराठी माध्यमाच्या पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गणिताचे ई साहित्य तयार करण्याबाबत एससीईआरटीकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला शासनाने मान्यता दिली आहे. या अंतर्गत ई साहित्य निर्मितीसाठी आवश्यक साधनांची खरेदी, व्हिडिओ निर्मिती, भाषांतर अशा खर्चांसाठी निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

## कार्यविस्तारासाठी अभ्यासवर्ग महत्त्वाचे -सुरेश पाटील

**उरण : वार्ताहर, बातमीदार, प्रतिनिधी**

भारतीय मजदूर संघाचा अखिल भारतीय पाच दिवसांचा विविध महासंघांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा अभ्यासवर्ग १३ ते १७ जुलै दरम्यान डॉ. हेडगेवार स्मारक समितीच्या मधुकर भवन, रेशीम बाग, नागपूरमध्ये झाला. पोर्ट महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील यांनी या वेळी कार्यविस्तारासाठी अभ्यास वर्ग महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

अखिल भारतीय अभ्यास वर्गाचे उद्‌घाटन भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हिरण्यमय पंड्या यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या वेळी राष्ट्रीय संघटन मंत्री बी. सुरेंद्रन, राष्ट्रीय महामंत्री बी. के. सिन्हा, राष्ट्रीय मंत्री रवींद्र हिमते, नीलिमा चिमोटे, सुरेंद्र पांडे, राष्ट्रीय उपाध्यक्षा नीता चौबे, जयंतीलाल, राष्ट्रीय नेते अण्णा धुमाळ, पोर्ट महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील, कोषाध्यक्ष सुधीर घरत, विदर्भ प्रदेशाध्यक्षा शिल्पा देशपांडे, कोयला खदान मजदूर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष टिकेश्वर सिंग, महामंत्री सुधीर घुरटे या अभ्यास



वर्गात भारतातील सर्व राज्यातील भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या केंद्र सरकार व राज्य सरकारमधील विविध उद्योगातील संघटनांचे अखिल भारतीय अध्यक्ष, महामंत्री, संघटन मंत्री, कोषाध्यक्ष इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सुरेश पाटील यांनी बहुमुल्य मार्गदर्शन केले. पाच दिवस चाललेल्या या अभ्यास वर्गामध्ये ३२ महासंघ आणि१२४ सुकाणू समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. अभ्यास वर्गात भारतीय मजदूर संघाची संघटना संस्कृती, मौलिक सिद्धांत, लेबर कोर्ट, नवीन लेबर कोर्ट वर्तमान व आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक मूल्य आणि कुटुंब व्यवस्था परिवर्तन व कामगार आदि विषयांवर मार्गदर्शन झाले.

## रसायनीतील पिल्लई कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बनविली मोटरबाईक

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनीतील महात्मा एज्युकेशन सोसायटी संचलीत पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी स्टारकर मोटरबाईकची निर्मिती केली आहे. विद्यार्थ्यांच्या नवकौशल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थ्यांनी एका दुचाकीचे इंजिन वापरून ही दुचाकी तयार केली आहे. ही दुचाकी कोणत्याही परिस्थितीत रोडवर धावू शकते. याचे प्रात्यक्षिक महाविद्यालयात मैदानावर करून दाखविले. दरम्यान, ही बाईक कॉंडटॉंक बाईक स्पर्धेत भाग घेण्यासाठी जाणार आहे. ही बाईक तयार करण्यासाठी पिल्लई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई, सचिव डॉ. डॅफनी पिल्लई यांनी मोठे योगदान दिले आहे. या वेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. निवेदिता श्रेयांश, डेप्युटी सीईओ डॉ.लता मेनन उपस्थित होते. डॉ.प्रियम पिल्लई, फणव पिल्लई, मुनाविरा पिल्लई यांनी सर्व मुलांचे कौतुक केले. ही बाईक बनविण्यासाठी प्राचार्य डॉ. जगदीश बाकल, मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. जी. व्ही. पाटील, के. एस. अनिष, आदित्य शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. यापूर्वीही महाविद्यालयाने गो कार्टकार स्पर्धेत भारतात प्रथम क्रमांक पटकावला होता. मागील वर्षी आयआयटीच्या स्पर्धेत इलेक्ट्रीक बाईक बनवून प्रथम क्रमांक पटकावला होता. आता ही बाईक मदुराई येथील स्पर्धेत उतरणार आहे. ही बाईक तयार करण्यात सर्वसामान्य घरातील मुले आहेत व त्यांना मॅनेजमेंट नेहमीच मदतीसाठी सरसावले आहे. दरम्यान, ही दुचाकी पेट्रोलवर चालते व सुरक्षितपणे कशी चालेल हेही पाहिले आहे. या दुचाकीसाठी संशोधन व डिझाईन स्पेअरपार्ट बनविणे यात वेळ लागतो व सर्व पंचवीस विद्यार्थ्यांनी मेहनतीने हे काम केले आहे.




MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.Tender fees Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000023778** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/Re- e-Tender-38/2022-2023.** Rfx Re-e-tender for work of AMC for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M DIV Panvel. **Tender amount Limited to Rs. 15,00,000/-, EMD amount Rs. 15,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **20.07.2022, 18:00 Hrs. to 27.07.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 27.07.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **28.07.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M. C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN. PANVEL**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No: EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/ Tech/Tender-34/ 2022-23 Dtd.24.06.2022 RFx No.7000023788** | **Sub:-** Second Call for SRM E-Tender for AMC of split AC units installed at EHV (O&M) Dn. office Mahad, 220 kV Kandalgaon,220 kV Vile Bhagad S/s , 100 kV Roha S/s & 100 kV Mhasala S/s under EHV O&M Dn. Mahad for the year 2022-23. | **Rs. up to 5,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/- plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from **21.07.2022 @ 00:00 hrs** to **27.07.2022 @ 23:59 Hrs** for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV(O&M) DN, MAHAD**


## रायगडात ६० टक्के क्षेत्रावर लावणीची कामे पूर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडत आहे. त्यामुळे भात रोप लावणीच्या कामाला वेग आला आहे. जिल्ह्यात भात लावणीची ६० टक्के काम पूर्ण झाली आहेत. येत्या आठवड्यात लावणीची कामे पूर्ण होतील, असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतात पाणी साचून राहिले. त्यामुळे पेण, माणगाव व कर्जत तालुक्यातील काही भागांमध्ये सुमारे १०० हेक्टर क्षेत्रावरील भात रोपे कुजून शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. जूनच्या सुरुवातीला पाऊस पडला. त्यानंतर पावसाने दडी मारली. पावसाचा पाठशिवणीचा खेळ सुरू होता. आर्द्रा नक्षत्राच्या सुरुवातीला जोरदार पाऊस पडला. पुनर्वसु नक्षत्रात दमदार पाऊस झाला. मुसळधार पावसाने रायगडला झोडपून काढले. या पावसामुळे खाचरांमध्ये पाणी साठले होते. त्यामुळे लावणीची कामे खोळंबली. मागील चार दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी लावणीच्या कामांना सुरुवात केली. जिल्ह्यात आतापर्यंत ६० टक्के क्षेत्रात भात लावणी पूर्ण झाली आहे.


मजूर मिळत नसल्यामुळे काही भागांमध्ये लावणीची काम खोळंबली आहेत. रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण झाल्यामुळे शेतावर काम करण्यासाठी मजूर मिळेनासे झाले आहेत.

> **जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पेण, माणगाव व कर्जत या तालुक्यांमध्ये भात रोपे कुजली. त्याचे पंचनामे करण्यात आले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना शासनाच्या निकषानुसार भरपाई मिळेल.**
> **-डी. एस. काळभोर, उपसंचालक, कृषी विभाग, रायगड**

पान १ वरून

## विवेक पाटलांवर आता सीआयडीचाही खटला

सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रावर बुधवारी (दि. २०) पनवेल कोर्टात सुनावणी झाली. न्यायमूर्ती जे. डी. वडने यांच्या कोर्टात विवेक पाटील यांच्यातर्फे ॲड. सचिन म्हात्रे, तर सरकारतर्फे ॲड. प्रिती साळवी हजर होते, मात्र न्यायालयीन कोठडीत असलेले आरोपी विवेक पाटील यांना या वेळी कोर्टात हजर करण्यात आले नव्हते. कोर्टाने पुढील सुनावणीसाठी २८ जुलै ही तारीख दिली आहे. ईडीबरोबरच सीआयडीचा ससेमिरा मागे लागल्याने विवेक पाटील यांच्या अडचणीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.


**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. २१ जुलै २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड  कोव्हॅक्सिन  कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000024027** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/Re-e-Tender-39/2022-2023.** RFx Re-e-tender for providing and Fixing of Bird Guard (Spike Type) at suspension locations of 220kV Nagothane-Wadkhal 1& 2, 220kV Apta-Uran-1,100kV Apta-MUSCO 1&2, 100kV Apta-Khopoli-Bhokarpada, 100kV Apta-Khopoli, 100kV Bhokarpada-Taloja and 100kV Kalwa-Khopoli D/C Line on urgent basis under EHV under EHV Lines S/Dn Panvel under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 17,53,872/-, EMD amount Rs. 17,539/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **20.07.2022, 18:00 Hrs. to 27.07.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 27.07.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **28.07.2022 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ Re-Tender-36/2022-23 Dtd.20.07.2022 RFX No. 7000024026** | **Sub:-** Invitation of RE-Tender for providing various consumables items for pre monsoon maintenance at various locations under Mahad Dn. for the year 2022-23 | **Rs. up to 4,85,325/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/- plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from **21.07.2022 @ 00:00 hrs** to **27.07.2022 @ 23:59 Hrs** for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV(O&M) DN, MAHAD**

# भाजपकडून रस्त्यांची डागडुजी

## खांदा वसाहतीमध्ये खड्डेमुक्तीसाठी श्रमदान
## माजी उपमहापौर सीताताई पाटील, एकनाथ गायकवाड, अभिषेक भोपी यांचा पुढाकार

**पनवेल : वार्ताहर**

खांदा वसाहतीत रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्याकडे सिडकोने सातत्याने दुर्लक्ष केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यात पावसाने थैमान घातल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. या कारणाने भारतीय जनता पक्षाने श्रमदान करून हे खड्डे बुजविण्याचा प्रयत्न केला. या कामी माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड आणि भाजप युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी यांनी पुढाकार घेतला.

महानगर गॅसची पाइपलाइन टाकण्यासाठी खांदा वसाहतीतील रस्ते मोठ्या प्रमाणात खोदण्यात आले आहेत. ते पूर्ववत करण्याची तसदी सिडकोने घेतलेली नाही. त्याचबरोबर इतर रस्त्यांची देखभाल व डागडुजी करण्याकडे त्यांनी कानाडोळा केला आहे. त्यामुळे रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यातून वाट काढताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. दररोज लहान-मोठे अपघात घडत आहेत. त्याचबरोबर वाहनांचा वेग मंदावल्याने वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागात मुसळधार पाऊस पडतोय. त्यामुळे रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.

पनवेल महानगरपालिकेने हे रस्ते दुरुस्त करण्याकरता सकारात्मक भूमिका घेतली आहे. महासभेने मंजुरीसुद्धा दिली आहे, परंतु निविदा प्रक्रियेला वेळ लागणार असल्याने सध्या महापालिकेचे



हात बांधले आहेत. सिडकोने मनपाकडे बोट दाखवत एक प्रकारे हात वर केले आहेत. त्यामुळे पनवेलच्या माजी उपमहापौर सीताताई सदानंद पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष अभिषेक संजय भोपी यांच्यासह युवा कार्यकर्त्यांनी

**खांदा वसाहतीतील रस्ते खड्डेमुक्त असावेत यासाठी भाजप युवा मोर्चाच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. आता या रस्त्यांची देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी लवकरच महापालिका घेणार आहे. महासभेने त्याला मंजुरी दिली असून निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन एजन्सी नियुक्त होणार आहे. त्याला काहीसा वेळ लागत असल्याने आम्ही सीताताई पाटील आणि एकनाथदादा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदान करून धोकादायक खड्डे बुजविण्याचा प्रयत्न केला.**
**-अभिषेक संजय भोपी, शहराध्यक्ष,**
**भाजप युवा मोर्चा, खांदा कॉलनी**

श्रमदान करून ज्या ज्या ठिकाणी अत्यंत धोकादायक खड्डे आहेत. ते माती आणि खडी टाकून बुजवले. संजय भोपी प्रतिष्ठानचे ऋषिकेश साबळे, रोहित साबळे, सुजय कदम, अनिकेत सानप, अमित खरात, यश राठोड यांच्यासह इतरांनी श्रमदानामध्ये सहभाग नोंदवला.

# उलव्यातील महिलेस सायबर चोरट्याकडून दीड लाखाचा गंडा

## ऑनलाइन कपडे मागवणे पडले महागात

**पनवेल : वार्ताहर**

फेसबूकवरून ऑनलाइन महिलांचे कपडे मागवणे उलवे भागातील महिलेस चांगलेच महागात पडले आहे. या प्रकरणात सायबर चोरट्याने कुरीयर कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवून या महिलेने मागविलेले ऑनलाइन कपड्याचे पार्सल रद्द होऊ नये यासाठी गंडा घालून खात्यातून एक लाख ६८ हजार रुपये परस्पर काढून घेतल्याचे उघडकीस आले आहे. न्हावा-शेवा पोलिसांनी या प्रकरणी सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.



(प्रातिनिधीक छायाचित्र)

फसवणूक झालेली ४५ वर्षीय महिला उलवे भागात राहण्यास असून एप्रिल महिन्यामध्ये या महिलेने फेसबुकवरील जाहिरातीतून ऑनलाइन महिलांचे ड्रेस मटेरीयलचे कपडे मागवले होते. १३०० रुपये फोन पेद्वारे पाठवून दिल्यानंतर तीन दिवसामध्ये त्यांच्या कपड्याचे पार्सल कुरीयरद्वारे घरपोच मिळाले होते. त्यामुळे जून महिन्यामध्ये या महिलेने पुन्हा त्याच व्हॉटस्ॲप वरुन चॅट करुन ९५० रुपये किंमतीचे ड्रेस मटेरियलचे कपडे मागविले होते. त्याचे पैसे देखील त्यांनी ऑनलाईन पाठवून दिले होते. त्यानंतर या महिलेने ८०० रुपये पाठवून आणखी एक ड्रेस मटेरियल मागविले होते. या ड्रेस मटेरियलचे पार्सल पाठवण्यात आल्याचा मेसेज तक्रारदार महिलेला तत्काळ मिळाला, मात्र दोन दिवसापूर्वी मागविलेल्या पार्सलबाबत मेसेज न आल्याने त्याची माहिती घेण्यासाठी या महिलेने मारुती कुरीयरचे गुगलद्वारे ट्रॅक करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर एका सायबर चोरट्याने मारुती कुरीयर कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवून या महिलेला संपर्क साधला. त्यांनी ऑनलाइन मारुती कुरीयर ट्रॅक केल्यामुळे त्यांच्या पार्सलचे कुरीयर डीॲक्टीवेट झाल्याचे सांगून ते ॲक्टीवेट करण्यासाठी पाच रुपये पाठविण्यासाठी युपीआय क्रमांक पाठवून दिला. त्यामुळे सायबर चोरट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून या महिलेने पाच रुपये देणार असल्याचे सांगितल्यानंतर त्याने फोन बंद केला.

दरम्यान, या महिलेला संशय आल्याने तीने गुगलवरून एसबीआय कस्टमर केअरचा नंबर शोधून त्यावर संपर्क खाते बंद करण्यास सांगितले. याच कालावधीत सायबर चोरट्याने वेगवेगळ्या युपीआय ट्रान्झेक्शनद्वारे या महिलेच्या खात्यातील एक लाख ६८ हजार रुपये काढून घेतले. प्रकार लक्षात आल्यानंतर या महिलेने न्हावा शेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## बूस्टर डोस...!



**पनवेल : शासनाच्या माध्यमातून १८ ते ६० या वयोगटातील सर्व नागरिकांसाठी कोरोना प्रतिबंधात्मक मोफत बूस्टर डोस उपलब्ध झाला आहे. त्या अनुषंगाने माजी नगरसेविका सुशिला जगदिश घरत यांच्या प्रयत्नातून प्रभाग १७मधील नागरिकांना सीकेटी विद्यालयात बूस्टर डोस उपलब्ध करून देण्यात आला. त्याचा लाभ नागरिकांना होत असून नागरिकांकडून सरकारचे तसेच सुशिला घरत यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आविष्कार अभिमुखता व्याख्यान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि. २०) आविष्कार अभिमुखता व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्राध्यापक डॉ. हर्षा गोयल यांनी प्रमुख वक्ते म्हणून भूमिका बजावली.



या व्याख्यानामध्ये वक्त्यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना संशोधनाचे प्रकार, महत्त्व, पद्धती याविषयी माहिती व मोलाचे मार्गदर्शन केले. या व्याख्यानाचे आयोजन वाणिज्य विभागप्रमुख प्रा. नम्रता गजरा, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वीरित्या केले.प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या व्याख्यानासाठी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. महादेव चव्हाण यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. या व्याख्यानाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष वाय.टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# 'सीकेटी'त गायन स्पर्धा, बक्षीस वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभागाच्या वतीने गुरुपौर्णिमा विविध उपक्रम राबवून साजरा केली जात आहे. त्याअंतर्गत पर्यवेक्षिका संध्या अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुपौर्णिमेनिमित्त गीतगायन स्पर्धा व बक्षीस वितरण समारंभ बुधवारी (दि. २०) झाला.



या कार्यक्रमाची सुरुवात स्वर म्हात्रे व गायक वृंदाने सादर केलेल्या गीताने झाली. तर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथिनिमित्त आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेच्या विजेत्यांचे व कला चिल्ड्रन अकादमीतर्फे शालांतार्गत चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धेमधील विजेत्यांचा ही गुणगौरव करण्यात आले.



या वेळी इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागाच्या निलिमा शिंदे, शिक्षक पालक संघाचे सदस्य संकेश मोकल, स्मिता पाटील, नंदकुमार देशमुख, प्रियांका मयेकर यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# पिरकोन येथील शाळेत वह्यावाटप

## आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या सौजन्याने रायगड जिल्हा परिषदेच्या पिरकोन गावातील शाळेत वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच उरण पूर्व विभागातही वह्यावाटप करण्यात आल्या.

या वेळी उरण तालुका उपाध्यक्ष भाजप मुकुंद गावंड, सामाजिक कार्यकर्ते विजय गावंड, नामदेव पाटील, अनंत गावंड, अजय गावंड, युवा कार्यकर्ते अंकित पाटील, शनिदास गावंड, जुई गावातील सामाजिक कार्यकर्ते जयेंद्र म्हात्रे व मुख्यध्यापिका गायकवाड मॅडम, प्रियंका गायकवाड व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.





**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या मोरबे येथील शाळेत वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी भाजप विभाग अध्यक्ष बाळाराम उसाटकर, मोरबेचे उपसरपंच परशुराम नावडेकर, सदस्य रमेश नावडेकर, एकनाथ नाईक, माजी सदस्य रामदास म्हात्रे, चिंध्रण पंचायत समिती सरचिटणीस प्रमोद रामदास भगत, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, हभप प्रभाकर नावडेकर, पाटील, युवा नेते दिनेश फडके, जीवन नावडेकर तसेच सर्व शिक्षक कमिटी, विद्यार्थी उपस्थित होते.**

# सीकेटी महाविद्यालयात बँक राष्ट्रीयकरण दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, मुंबई व सीकेटी महाविद्यालयाच्या अर्थशात्र विभागातर्फे बँक राष्ट्रीयकरण दिन नुकताच थाटात साजरा करण्यात आला. या वेळी बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, मुंबईचे संघटन सचिव, अरविंद मोरे, अर्थशात्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील व प्रा. काकासाहेब ढवळे उपस्थित होते.



या वेळी प्रमुख वक्ते अरविंद मोरे यांनी बँकांचे राष्ट्रीयकरण झाले तेव्हा पासून देशाची आर्थिक प्रगती होऊन आपला देश कसा समृद्ध झाला हे सांगितले. ते पुढे म्हणाले की, राष्ट्रीयकृत बँकांनी मोठ्या उद्योगापासून तर छोट्या उद्योगधंद्यांना कर्ज देऊन सर्वांना समृद्ध करून त्यांना मुख्य प्रवाहात आणले. राष्ट्रीयकृत बँकांनी जी कामगिरी प्राथमिक क्षेत्रात केली आहे ती उल्लेखनीय आहे. राष्ट्रीयकृत बँकांमुळे बँकांचा विस्तार होऊन बँक समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहचून बँकिंग सुविधांचा सर्वांना लाभ मिळाला आहे. ह्या सर्व राष्ट्रीयकृत बँक तंत्रज्ञानाने समृद्ध असून त्या कालानुरूप बदलून व स्वतःला सक्षम करून अद्यावत व तत्पर सेवा देत आहेत. राष्ट्रीयकृत बँकांमुळे लाखो तरुणांना रोजगारसुद्धा मिळाला आहे.

प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकेत बँक राष्ट्रीयकरणामुळे देशाचा कसा विकास झाला हे सांगितले.

दरम्यान, या वेळी विद्याथ्यांची ५३ शिष्यवृत्तीची खाती सुद्धा उघडण्यात आली. उपस्थितांचे आभार प्रा. काकासाहेब ढवळे यांनी मानले. या वेळी अर्थशास्त्राचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते 'दिबा'साहेबांना सांस्कृतिक आदरांजली

**उरण : बातमीदार**

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी व दि. बा. पाटील यांच्या विचारांची संस्कृती जपण्यासाठी एकविरा कला संस्था (पनवेल-रायगड) या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून 'दिबा'साहेबांना सांस्कृतिक आदरांजली देण्यात येणार आहे.

कामोठे गाव आगरी समाज मंगल कार्यालयात ७ ऑगस्ट २०२२ रोजी ९.३० वाजता 'दिबा'साहेबांना सांस्कृतिक आदरांजली' या नावाने अभंग स्पर्धा, पखवाज वादन स्पर्धा, तबला वादन स्पर्धा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सादरीकरण कालावधी १ ते ५ मिनिटांचा असून वय वर्षे १० ते १८ व १८ ते खुलागट असे स्पर्धेचे गट आहेत. शिवाय विविध मान्यवरांचा 'दिबां'चा योद्धा म्हणून विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

मराठी इंडियन आयडल विजेता सागर म्हात्रे याचा विशेष नागरी सत्कार होणार आहे. तरी स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी अविनाश पाटील (९९३००१०४२२), मिलिंद कडू (८०८०९३४९३८) यांच्याशी संपर्क साधावे, असे आवाहन एकविरा कला संस्थेचे संस्थापक तथा अध्यक्ष तेजस पाटील यांनी केले आहे

एकविरा कला या संस्थेने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, अशी आग्रही मागणी नेहमी सातत्याने केली होती. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव मिळावे यासाठी नेहमी आंदोलन उपोषणामध्ये एकविरा कला संस्था सहभागी झाली होती.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**

***अ.*** टाटा एलक्सी — ***आ.*** हॅपीइस्ट माइंड
***इ.*** झेन्सर टेक्नोलॉजीस — ***ई.*** बीएएसएफ इंडिया

**२. पुढील पैकी कोणत्या कंपनीचा सेन्सेक्स ३० कंपन्यांत समावेश होत नाही?**

***अ.*** सनफार्मा — ***आ.*** बजाज फायनान्स
***इ.*** एनटीपीसी — ***ई.*** बजाज ऑटो

**३. भारताला आपल्या गरजेच्या इतके टक्के इंधनाची आयात करावी लागते?**

***अ.*** १०० टक्के — ***आ.*** ८५ टक्के
***इ.*** ६० टक्के — ***ई.*** ५० टक्के

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**


## संपादकीय

# वचनपूर्तीचे समाधान

**महाराष्ट्रात जवळपास गेला महिनाभर सुरू असलेल्या सत्तासंघर्षाच्या वादाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने १ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलली. त्यामुळे काहींच्या चेहऱ्यावर निराशेचे ढग दाटून आलेले दिसले खरे, परंतु त्याच सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २७ टक्के ओबीसी आरक्षणासह त्वरीत घेण्याचे आदेश दिल्याने समाजातील एका मोठ्या समुहाला दिलासा मिळाला आहे.**

गेले वर्षभर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम महाराष्ट्रात वाजत होते. ओबीसी आरक्षणात निर्माण झालेल्या तिढ्यामुळे या निवडणुका सतत लांबणीवर टाकल्या जात होत्या. सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी दिलेल्या निर्णयामुळे या निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. पावसाळा संपताच राज्यातील महापालिका, जिल्हा परिषदा, नगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका एकदाच्या होणार हे आता स्पष्ट झाले आहे. खरी शिवसेना कोणाची या प्रश्नाने काही जणांना छळले आहे. या प्रश्नाचे उत्तर सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यात नक्कीच मिळेल आणि शिवाय निवडणुकांच्या माध्यमातून मतदारांनाही आपला कौल देण्याची संधी सर्वोच्च न्यायालयामुळेच मिळणार आहे. म्हणजेच एका अर्थी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका मिनी विधानसभा निवडणुकाच ठरणार आहेत. ओबीसी आरक्षणाबाबत सातत्याने प्रश्नचिन्हे उभी राहात होती. खरेतर हा प्रश्न फडणवीस सरकारने सोडवत आणला होता, परंतु मधल्या काळात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर हा प्रश्न घोंगड्यासारखा भिजत पडला. जेमतेम अडीच वर्षे हे सरकार टिकले. त्यातील जवळपास १५ महिने केंद्र सरकारवर खापर फोडण्यापलीकडे या सरकारने ढिम्म हालचाल न केल्याने ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अधांतरी लटकला. ट्रिपल टेस्ट आणि इम्पिरिकल डेटाशिवाय ओबीसी आरक्षण देता येणार नाही हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगूनही ठाकरे सरकारने फक्त वेळकाढूपणा केला. त्या वेळी विरोधी पक्षनेतेपदी असलेले देवेंद्र फडणवीस वारंवार राज्य सरकारला जागे करण्यासाठी प्रयत्न करत होते. महाराष्ट्राच्या मागून येऊन मध्य प्रदेश सरकारने अवघ्या महिन्याभरात इम्पिरिकल डेटा जमा करून सर्वोच्च न्यायालयाकडून ओबीसी आरक्षणाची मान्यता मिळवली. अखेरे हो-ना करता करता राज्याचे माजी मुख्य सचिव जयंतकुमार बांठिया यांच्या अध्यक्षतेखाली समर्पित आयोग नेमण्याची कृती राज्य सरकारने केली. सुधारित बांठिया अहवालानुसार येत्या दोन आठवड्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करावा, असे निर्देश आता सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले आहेत. याचे संपूर्ण श्रेय गेल्या फडणवीस सरकारला आणि त्यानंतरच्या काळात विरोधात असूनही व्यक्तिश: देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या प्रयत्नांना द्यावे लागेल. महाविकास आघाडीला श्रेय घ्यायचेच असेल, तर वेळकाढूपणाचे घ्यावे लागेल. म्हणूनच भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'ठाकरे सरकार गेले आणि आरक्षण आले' अशा शेलक्या शब्दांत आपली प्रतिक्रिया नोंदवली. त्यांची ही प्रतिक्रिया बोलकी तर आहेच, परंतु महाराष्ट्रातील संपूर्ण ओबीसी समाजाच्या भावना शब्दरूपात मांडणारी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार येत्या दोन आठवड्यांत राज्यभरातील निरनिराळ्या स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होईल. या निवडणुकीतच महाविकास आघाडीला जनताजनार्दन खऱ्या अर्थाने आरसा दाखवेल असे मानायला हरकत नाही. भारतीय जनता पक्षासाठी मात्र वचनपूर्तीचे समाधान शांतपणे व्यक्त करण्याचा हा निर्णय ठरला आहे.

# चोळई गाव बनलेय दरडग्रस्त, अपघातप्रवण क्षेत्र




मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटामध्ये गेल्या काही वर्षांपासून सडवली ग्रुपग्रामपंचायतीच्या हद्दीतील चोळई गाव हे दरडप्रवण क्षेत्र आणि अपघातप्रवण क्षेत्र झाले आहे. हे दुहेरी संकट ओढविण्यामागे प्रशासनच कारणीभूत आहे.

नैसर्गिक आपत्ती या सबबीखाली या गावावर ओढविणाऱ्या आपत्तींचे वर्णन करून आजमितीस सर्व संकटांना पांघरूण घालून बळींच्या वारसांना मदत आणि आपत्तीप्रवण क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्यांचे स्थलांतर एवढेच काम आपत्तीनिवारण कक्षामार्फत केले गेले आहे. चौपदरीकरणच्या आधीपासूनच अपघातप्रवण क्षेत्र असलेल्या चोळई गावाच्या घाटरस्त्याच्या मार्गिकांचे नवे स्वरूप अपघात टाळण्यासाठी होण्याऐवजी नवीन चार पदरी रस्त्यांनाही अपघातप्रवण असा शिक्का बसेल एवढे अपघात गेल्या काही आठवड्यांपासून चोळई गावालगत कशेडी घाटातील तीव्र उताराच्या घाटरस्त्यामध्ये झाले आहेत.

पोलादपूरपासून गोव्याच्या दिशेने केवळ एक कि.मी. अंतरावर चोळई गावापासून कशेडी घाटातील तीव्र वळणांना सुरूवात होते. साधारणत: कशेडी टॅप वाहतूक पोलीस चौकीपर्यंतचे १२ कि.मी.अंतर आणि तेथून पुढे खेड तालुक्यातील ८ कि.मी. अंतराचा असा एकूण २० ते २१ कि.मी. अंतराचा हा कशेडी घाट सातत्याने धोकादायक ठरला आहे. जीवघेण्या अपघातांचे सातत्य टिकवून आहे. याचसोबत कशेडी घाटात दरवर्षी रस्ता रूंदीकरण, धोकादायक वळणे कमी करणे, तीव्र उतार कमी करणे, साईडपट्ट्यांचे मजबूतीकरण, दूतर्फा गटारांची कामे, संरक्षक कठडे आदी विविध कामे राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असल्याचेही सातत्याने दिसून आले आहे. मात्र, या कामांचा अपेक्षीत परिणाम दिसून येत नाही. यामुळे जनतेमध्ये नाराजी आहे.

कशेडी घाटाच्या सुरूवातीस वसलेल्या चोळई गावाच्या हनुमानमंदिरालगतच्या संरक्षक कठड्याला ठोकरून अनेक महाकाय कन्टेनर, टँकर्स, जीप, व्हॅन आदी वाहने गावाच्या बुरूड समाजाच्या लोकवस्तीपर्यंत झेपावत असतात. त्यामुळे या गावावर अपघातांची कायम टांगती तलवार असल्याचे सूचित करीत आहे. मात्र, तरीही संबधित विभागामार्फत या अपघातांची गांभिर्याने दखल घेण्यात आलेली नाही. अद्याप अपघातांची मालिका ही कायम सुरू आहे. या वळणांवरील गोव्याकडून घाटरस्ता उतरणाऱ्या वाहनांना मुंबईकडून जाणाऱ्या वाहनांचे अचानक दर्शन होऊन तोपर्यंत अपघात घडत असल्याचे अनेकदा पोलीस पंचनाम्यामध्ये उघड झाले आहे.

दोन वर्षांपूर्वी पालकमंत्री आदिती ठाकरे यांचा याबाबत दौरा झाला होता. यावेळी कशेडी घाटातील अपघातांबाबत तसेच धोकादायक प्रवासासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तसेच आयुक्त उपस्थित होते. मात्र पालकमंत्र्यांच्या सूचनांना हरताळच अधिकाऱ्यांनी फासल्याचे दिसून येत आहे. याकडे दुर्लक्ष होत असल्याने राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे चांगलेच फावले आहे. चोळई गावातून चारपदरी रस्त्याचे काम सुरू झाले आणि तरीही हे काम अपघातप्रवण क्षेत्र असा शिक्का पुसू शकले नसल्याने प्रशासन सातत्याने घडणाऱ्या अपघातांच्या घटनांची तसेच अपघात झाल्यानंतर प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांचीही दखल घेत नसल्याचे उघड झाले आहे.

गेल्या दोन तीन वर्षांमध्ये सडवली ग्रामपंचायत हद्दीतील चोळई गावांतील राष्ट्रीय महामार्गालगतची लोकवस्तीदेखील दरडग्रस्त होण्यासारखी परिस्थिती सततच्या माती उत्खननानंतर निर्माण झाली असून गेल्याच वर्षी महाडच्या सावित्री नदीवरील ब्रिटीशकालीन पूल कोसळण्याची दूर्घटना रात्री घडण्याच्यापूर्वीच सकाळी चोळईतील एका ढाब्यावर दरड कोसळून ढाबामालक उदय चिकणे याचा दरडीखाली मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. अद्याप याठिकाणी मोठया प्रमाणात माती उत्खनन सुरू असून हा धोका अद्याप कायम राहिला आहे. पोलादपूर तालुक्यातील अनेक गावांच्या रस्त्यांलगत डोंगरउतारावरील तसेच डोंगरमाथ्यावरील जमिनींची विक्री गेल्या काही वर्षांपासून मोठया प्रमाणात झाल्यानंतर या जमिनींपर्यंत पोहोचण्यासाठी माती उत्खनन करून रस्त्याची निर्मिती मोठया प्रमाणात झालेली दिसून येत आहे. दरम्यान, गेल्यावर्षी महाड, पोलादपूरमध्ये आलेल्या अतिवृष्टीतील आपत्तींमध्ये भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या तालुक्यामध्ये तत्काळ पोचून अनेक आपत्तीग्रस्तांना मोठी मदत केली होती. याची आठवण आजही सर्वांच्या मनात आहे.

पोलादपूर तालुक्यात यंदा रात्रीपासूनच धुवाँधार पावसामुळे कशेडी घाटातील चोळई येथे दरड कोसळली. गेल्यावर्षी याठिकाणी उत्खननामुळे दरडीचा धोका लक्षात घेऊन चोळईच्या ग्रामस्थांनी उठाव केला होता. मात्र, त्यावेळी अतिवृष्टीकाळात दरड न कोसळल्याने कोणताही संघर्ष झाला नव्हता. यंदा पावसाचा जोर वाढताच चोळई येथील या उत्खननाच्या ठिकाणी दरडी कोसळून रस्त्यावर येण्यास सुरूवात झाली. प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत सुरक्षेचा उपाय म्हणून चोळई येथील २० कुटुंबांतील सुमारे ७५ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी विद्यामंदिर पोलादपूर येथे हलविले असल्याचा दावा केला आहे. मात्र, याठिकाणी अनेक ग्रामस्थांनी जीवाच्या भितीने आपआपल्या परगावांतील नातेवाईकांच्या घरी आश्रय घेतल्याची माहिती प्राप्त झाली आहे. गाव आणि ग्रामस्थ रिकामे करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले. मात्र या घटनाक्रमांमध्ये प्रशासनाने 'हम करे सो कायदा' अशी भुमिका घेतल्याचे दिसून आल आणि तशी चर्चा सुरु आहे. दरडी कोसळल्याच्या ठिकाणी चौपदरीकरणाच्या कामामुळे डोंगराचा भाग कापण्यात आला आहे. पावसामुळे दरडीचे ढिगारेच्या ढिगारे दगड मातीसह महामार्गावर खाली कोसळत असल्याने या गावाला धोका निर्माण झाल्याचे लक्षात आले.

पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाला सडवली फाटा-चोळई येथून सुरूवात होत असून या ठिकाणापासून कशेडी घाटामध्ये अनेक ठिकाणी वाहने कलंडण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. अनेकवेळा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे वाहने चालविल्याबद्दल वाहनचालकांविरूध्द गुन्हे दाखल करणाऱ्या पोलिसांनी हा कशेडी घाटरस्ता ज्या विभागाकडे आहे; त्या विभागाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी. वाहनांची तीव्र वळण उतारांवरून येण्याची क्षमता असते त्यापेक्षाही बिकट असे वळणउतार या घाटात तयार करून अपघातप्रवण क्षेत्राची निर्मिती करून अनेकांना जीवास मुकण्यास कारणीभूत ठरल्याबाबत या संबंधितांवर दोषी ठरल्यास गुन्हा दाखल करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, कशेडी घाटातील सद्यस्थिती लक्षात घ्यावी आणि उपाययोजना व्हाव्यात अशी मागणी नागरिकांकडून आता नवीन सरकारकडे होऊ लागली आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# ओटीटी आता इंटरनेटशिवाय

दूरसंचार विभाग आणि भारताच्या सार्वजनिक सेवा प्रसारक प्रसार भारती यांनी एक टेक्नोलॉजी आणली आहे ज्याद्वारे प्रत्येकाला आता अगदी कमी खर्चात आणि इंटरनेट डेटाशिवाय ओटीटी प्लॅटफॉर्मचा लाभ मिळणार. डायरेक्ट-टू-मोबाइल ब्रॉडकास्टिंग असे या टेक्नोलॉजीचे नाव आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, कोणत्याही डेटा कनेक्शनशिवाय, तुम्ही सर्व व्हिडिओ आणि मल्टीमीडिया प्लॅटफॉर्मचा आनंद थेट मोबाइलवर घेऊ शकता. डायरेक्ट-टू-मोबाइल ब्रॉडकास्ट टेक्नॉलॉजी म्हणजे व्हिडिओ आणि इतर मल्टीमीडिया कंटेट थेट तुम्हाला तुमच्या मोबाइलवर पाहता येणार. म्हणजेच इंटरनेट, केबल किंवा डीटीएच शिवाय तुम्हाला मोबाईलमध्ये बातम्या, क्रिकेट, चित्रपट इत्यादी सर्व मनोरंजनाचा कंटेट, व्हिडिओ मोफत पाहण्याची सुविधा मिळणार. याशिवाय, इंटरनेटशिवाय तुमच्या मोबाइल फोनवर, हॉटस्टार, सोनी लाईव्ह, झी फाइव्ह, ॲमेझॉन प्राइम आणि नेटफ्लिक्स सारख्या टॉप कंटेट, चित्रपटांसह मल्टीमीडिया कमी खर्चात बफरिंगशिवाय प्रत्येक घरापर्यंत सहज सुविधा पोहोचतील.



भारताचा दूरसंचार विभाग या टेक्नोलॉजीद्वारे नागरिकांना केंद्रबिंदू ठरवत त्या कंटेट थेट पुरवू शकतो आणि त्याचा वापर आपत्कालीन सूचना जारी करण्यासाठी किंवा आपत्ती व्यवस्थापन करताना मदत करण्यासाठी केला जाऊ शकतो. याशिवाय मोबाईल फोनवर थेट बातम्या, खेळ इत्यादी कंटेट पुरवणे सोपी जाते. दरम्यान, भारतात मोबाइल टेक्नोलॉजी येण्यास उशीर झाला असला तरी आलेल्या टेक्नोलॉजीचा पुरेपुर फायदा करून घेण्यात भारतीय मोबाइल युझर्स अमेरिकेपेक्षाही 'स्मार्ट' असल्याची माहिती एका टेक्नो सर्वेक्षणात समोर आली आहे. स्मार्ट फोन मार्फत ई-मेल आणि सोशल नेटवर्किंग सुविधा वापरणाऱ्यांची संख्या अमेरिकेहून भारतात जास्त आहे, असे या अहवालात म्हटले आहे.

भारतातील प्रमुख महानगरांमधे गुगलने इपसोस आणि मोबाइल मार्केटींग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या एका सर्वेनुसार भारतातील स्मार्टफोन युझर्सची संख्या अमेरिकेतील २४ कोटी ५० लाख संख्येच्या ५० टक्के असुनही भारतातील ५६टक्के स्मार्टफोन युझर्स दिवसातून अनेक वेळा मोबाइलचा वापर करतात.

# प्रतिभावान गीतकार आनंद बक्षी

आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. बक्षी यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या आई सुमित्रा आनंद बक्षी यांचे ते पाच वर्षांचे असताना निधन झाले. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर, १९४७ रोजी भारतात आले. दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले.



कविता हा त्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळ होते. शब्दांच्या मळ्यात फिरणारे, त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी. लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हे शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचे. त्यांच्यातील प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले. त्यांच्या शब्दांची जादूच तशी होती. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. गायक व्हायचे आनंद बक्षींच्या मनात खूप होते. मात्र त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी. शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. १९५८मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते.

सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणाऱ्या शब्दांची सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये आहेत. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या.

संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबरोबर आनंद बक्षी यांचे सूर जुळले. या त्रयीने अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. आने से उसके आये बहार (जीने की राह), बिंदिया चमकेगी (दो रास्ते), सावन का महिना (मिलन), मैं शायर तो नहीं (बॉबी), परदा है परदा (अमर अकबर अँथोनी), आदमी मुसाफिर है (अपनापन), डफलीवाले (सरगम), ओम शांती ओम (कर्ज) ही आनंद बक्षी-लक्ष्मी-प्यारे या त्रयींची काही सुपरहिट गाणी आहेत. लक्ष्मी-प्यारे यांच्याप्रमाणेच राहुलदेव बर्मन (आरडी) यांच्याबरोबरही आनंद बक्षी यांचे सूर जुळले. ना कोई उमंग है (कटी पतंग), रैना बीती जाए (अमर प्रेम), महेबूबा महेबूबा (शोले), परबत के पीछे (महेबूबा), सावन के झूले पडे (जुर्माना), दम मारो दम (हरे राम) ही आरडी-आनंद बक्षी यांची काही गाजलेली गाणी आहेत. कल्याणजी-आनंदजी, अन्नु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. त्यांची गाणी आजही रसिक मनामनामध्ये आहेत. या महान गीतकाराचे ३० मार्च २००२ रोजी निधन झाले.





**पनवेल : सध्या पावसामुळे निसर्ग सगळीकडे खुलला असल्याचे दिसून येत आहे. डोंगर आणि त्यातून वाहणारे धबधबे, ओढे सर्वांचे आकर्षण ठरत आहे. त्याचे करंबेळी येथे टिपलेले हे छायाचित्र.** (छाया : सुरज पाटील)

## आरोग्य प्रहर

### सपाट पाय : कारणे व उपाय

काही लहान मुलांचे पाय सपाट असतात. त्यांच्या पायाच्या मध्यभागी खोबणी नसते, परंतु ही कमान वयानुसार दिसते. या कमानीद्वारे, उभे राहणे आणि शरीराचे वजन संतुलित करणे, चालणे, धावणे आणि कोणत्याही दिशेने वेगाने जाणे सोपे होते. पायाची कमान स्थिरता आणते. या लोकांना चालणे, धावणे किंवा त्यांचे वजन संतुलित करणे यासाठी अधिक मेहनत घ्यावी लागते का? जाणून घेऊया या विषयीची माहिती.




सपाट पायाचे दोन प्रकार असतात. तुम्ही तुमचा पाय जमिनीवर ठेवता, तेव्हा ही कमान दिसत नाही आणि पाय हवेत असताना ती दिसते. जेथे पाय नेहमी सपाटच दिसतो. सपाट पाय असा विकसित होतो? चालणे किंवा धावणे यासारख्या गोष्टी करण्यासाठी तुमचा पाय खूप दबाव शोषून घेतो. याच्या जटिल रचनेत १९ स्नायू, २८ हाडे, ३३ सांधे आणि १०७ लीगामेंट्स समाविष्ट आहेत. ही रचना तुमच्या एकूण हालचालीला बळ देण्यासाठी एकत्र काम करते.

प्रत्येक वेळी चालता किंवा धावताना तुमचा पाय एका विशिष्ट पद्धतीने जमिनीवर येतो. काही लोक त्यांच्या शरीराच्या वजनाचा भार पायाच्या चवड्यावर ठेवतात, तर काही लोक तळव्याच्या आतील भागाचा अधिक उपयोग करतात. या प्रकारचे फूट-लँडिंग प्रोनेशन, सुपिनेशन आणि ओव्हरप्रोनेशन म्हणून ओळखले जाऊ शकते. सुपिनेशन म्हणजे जेव्हा प्रत्येक पाऊल ठेवताना तुमचे वजन पायाच्या बाहेरील बाजूवर जास्त येते. पाय आतल्या बाजूने वळतो तेव्हा तुमचे वजन तुमच्या पायाच्या आतील भागावर येते. पाय खूप आतील बाजूस वळतो तेव्हा ओव्हरप्रोनेशन होते, ज्यामुळे तुमचा घोटा जवळजवळ जमिनीवर येतो. ओव्हरप्रोनेशन दरम्यान पायाची-कमान सपाट होते, याला सपाट पाय असेही म्हणतात. पाय सपाट असण्याचा अर्थ हानिकारक स्थिती असणे असा होत नाही. अधिक कमान असणाऱ्या पायाच्या तुलनेत हे जास्त लवचिकता देऊन धक्के शोषून घेण्यास मदत करतात, परंतु हे तुमचा कठोर सपाट पाय आहे की लवचिक सपाट पाय आहे यावर ठरते.

ही एक सामान्य स्थिती आहे, ज्यामध्ये आपण आपला पाय हवेत वर उचलता पायातील कमान पूर्णपणे निरोगी आणि नेहेमीसारखी दिसते. मात्र, तुम्ही उभे राहता आणि पायावर काही वजन येते, तेव्हा ती सपाट होऊन दिसेनाशी होते. तुमचे वजन अधिक असो वा नसो, ह्या परिस्थितीमध्ये तुमचे पाय नेहमी सपाट/अतिजास्त आतल्या बाजूस गेलेले असतात. तुम्ही या श्रेणीत येत असल्यास वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे.

## सावरोली-खारपाडा मार्गावरील

# प्रवास धोकादायक

### उड्डाणपुलाजवळ जीवघेणे खड्डे



(छाया : विनायक माडये)

खोपोली : प्रतिनिधी

सावरोली-खारपाडा राज्यमार्गावर मुसळधार पावसात पडलेल्या खड्ड्यांचा आकार वाढतच असून या रस्त्यावर दुचाकीचे रोज अपघात घडत आहेत.

सावरोली-खारपाडा राज्य मार्गावर तीन ठिकाणी उड्डाणपूल आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर उड्डाणपूल असून दरवर्षी पावसाळ्यात पुलाच्या दोन्ही बाजूला खड्डे पडतात. यंदा जुलै महिन्यात कोसळलेल्या पावसात माजगाव, माडप गावाच्या हद्दीतील पुलाच्या दोन्ही बाजूला उतारावर खड्डे पडले आहेत. माडप पुलानजीक पडलेल्या खड्डयांचा आकार धडकी भरवित असून दुचाकी अपघाताचे सत्र सुरू झाले आहे. शिवाय पाण्याने भरलेल्या खड्ड्यांचा अंदाज न आल्याने चारचाकी वाहने खड्ड्यात आपटून प्रवाशांची हाडे खिळखिळी होत आहेत.

सावरोली-खारपाडा राज्यमार्ग जरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत असला तरी पुलापासून दोन्ही बाजूला दोनशे मीटर रस्त्याची देखभाल आयआरबीकडे आहे. त्यामुळे खड्डे बुजविण्याचे काम आयआरबीने तातडीने करावे अशी मागणी होत आहे.

**सावरोली-खारपाडा राज्यमार्गाच्या उतारावर खड्डे पडले असून रात्रीच्या वेळेस ते अजिबात दिसत नसल्याने अनेक दुचाकीस्वार पडून जखमी झाले आहेत. पाऊस कमी झाला आहे. आता हे खड्डे भरावेत.**
**-किरण पाटील, ग्रामस्थ, माडप, ता. खालापूर**

**खड्डे असलेल्या ठिकाणी पाहणी केली असून, डांबर प्लांट दोन दिवसात सुरू करण्यात येईल, शुक्रवारपासून या राज्यमार्गावरील खड्डे भरण्यात येतील.**
**-अनिल धायगुडे, अभियंता, आयआरबी**

# वीज ग्राहकांच्या समस्या सोडवा

## आगरी समाजाच्या शिष्टमंडळाचे अधीक्षक अभियंत्यांना साकडे





**पेण : प्रतिनिधी**

वीज ग्राहकांच्या विविध समस्या वरिष्ठांच्या निदर्शनास आणून त्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सोमवारी महावितरणचे पेण येथील अधीक्षक अभियंता इब्राहिम मुलाणी यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले.

दर महिन्याचे वीज बिल हे ग्राहकांच्या हाती भरणा तारखेनंतर दिले जात असल्याने ग्राहकांना अकारण विलंब आकाराचा भुर्दंड सोसावा लागत आहे, अनेकदा रिडींग न घेताच सरासरी बिल दिले जात असल्याने ग्राहकांना जादा बिलाची रक्कम कमी करणेसाठी कार्यालयात खेटे मारावे लागत आहेत, डीपी उघड्या अवस्थेत राहत असल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली असल्याची बाबही सूर्यकांत पाटील यांनी या वेळी अधीक्षक अभियंत्यांच्या निदर्शनास आणून दिली.

सडलेले पोल, गांजलेल्या तारा यामुळे खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याने ग्राहकांना होणारा त्रास, वीजबिल भरणा केंद्र वाढवून ग्राहकांची सोय करण्यात यावी. आणि तक्रार नोंदविण्यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्याकडून फोन उचलण्यात होणारी कुचराई यामुळे एखादी मोठी दुर्घटना घडविण्याची शक्यता असते. या आणि अशा अनेक मुद्यांवर यावेळी अधीक्षक आभियंत्यांशी चर्चा करण्यात आली. हे सर्व मुद्दे सार्वजनिक हिताचे आणि सर्वसामान्य ग्राहकांशी निगडित असल्याने त्यांचे तात्काळ निराकरण केले जाईल, असे आश्वासन महावितरणचे अधीक्षक अभियंता इब्राहिम मुलाणी यांची शिष्टमंडळास दिले.

या शिष्टमंडळात संस्थेचे खजिनदार पी. वाय. पाटील, उपाध्यक्षा मीनाक्षी पाटील, अशोक म्हात्रे, ओंकार पाटील, रवींद्र म्हात्रे, राजेंद्र वाघ, कल्पना टेमकर, लवेंद्र मोकल, गणेश पाटील यांचा समावेश होता. या वेळी वीज वितरण कंपनीचे बिलींग मॅनेजर बोरसे व पत्रकार उपस्थित होते.

## मुरूड मर्चंट सोसायटी चेअरमनपदी संदीप पाटील बिनविरोध

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका मर्चंट को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. या संस्थेच्या चेअरमनपदी संदीप पाटील यांची बिनविरोध निवड झाली. आमदार महेंद्र दळवी यांनी पाटील यांचे अभिनंदन केले व भावी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यासी अधिकारी पी. एम. वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २०) ही निवडणूक झाली. संचालक मंडळातील सर्व पदांसाठी प्रत्येकी एक अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली. त्यात ललित रतनचंद जैन (व्हाइस चेअरमन), नितीन आबुर्ले, अशोक धुमाळ, विपूल मेहता, अल्ताफ खतीब, डॉ. राजकुमार कल्याणी, नौशाद दळवी, विजय गिदी, महेंद्र पारेख, वासंती उमरोटकर, नगमाना खानजादे (सर्व संचालक) यांचा समावेश आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे मालक **मे. नोबल कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार जिया अब्दुल सत्तार नमरे,** यांनी सदरची मिळकत महाराष्ट्र शासन AKBSNA च्या मंजूर विकास आराखडा क्र. TPS-1204/941/CR-163/04/UD 12 दिनांक २५ जुलै २००५ व मंजूर UDCPR क्र. TPS-1818/CR-236/18/SEC, 37 (1AA/UD-13) दिनांक ०२/१२/२०२० नुसार २४.०० मीटर डी. पी. रोड दिलेला आहे.

सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत आमच्या अशिलांना हमी व भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही खरेदी, विक्री, गहाण, दान, लीज, लोन, साठेखत, कोर्ट हुकूम, वारसाहक्क, ताबे-वहिवाट अथवा कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार असल्यास याबाबत सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५ (पंधरा)** दिवसांच्या आत लेखी व योग्य त्या कागदपत्रासह खात्री करून दयावी. कार्यालयाचा पत्ता :- **गाळा नं. ७, फडके नाटयगृह कॉम्प्लेक्स, श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६** या पत्यावर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजण्यात येईल, तसेच ज्याचा हक्क असल्यास, त्याने तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार/कार्यवाही पुर्ण करतील. तदनंतर कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तथा चालणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आडिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे/गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (चौ. मी.) | २४ मीटर DP (चौ. मी.) |
|---|---|---|
| ७७ | ६०.२० | १९६५.०४६ |

दिनांक :- २१/०७/२०२२

**सही**
**ॲड. अतिश सुनिल परदेशी**
ॲड. हायकोर्ट
गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स, श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मोबा. नं. ९७०२८९८९८९



सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

## (वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/ करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **नोड - कामोठे** | | | | |
| १ | ५२ कामोठे | कामाठे २१९ | १२/५<br>२०७/११<br>२०९/४<br>२०९/१०<br>३५४/२<br>३६०/१०<br>१८५/७<br>१८८/३<br>१८९/७<br>१९८/१२ | ०-२८-०<br>०-०४-५<br>०-१७-७<br>०-४३-६<br>०-१६-४<br>०-०३-०<br>०-०५-३<br>०-०३-८<br>०-०२-०<br>०-१४-५ | १६०० चौ.मी. पैकी ५० चौ.मी. व १३५ चौ.मी. | मौजे-कामोठे, भूखंड क्र. ५A, सेक्टर-२४, क्षेत्र-४९.४५ चौ.मी. व भूखंड क्र. ६२A, सेक्टर-१०, क्षेत्र-१३५.०२ चौ.मी. | मा. न्यायालयिन रे.मु.क्र. ८५/२००२ व रे.मु.क्र. १७९/२०११ च्या तडजोड पुरशीनुसार भुधारक गोवऱ्या गोमा गोवारी यांना इरादित करण्यात आला आहे व मा. न्यायालयीन रे.मु.क्र. ८२/२००२ व रे.मु.क्र. १७९/२०११ व रे.मु.क्र. २३७/२०२० च्या तडजोड पुरशीनुसार वारसदाखल्यानूसार भुधारक कै. भरत गोमा गोवारी यांचे वारस<br>१. श्रीमती जयवंती भरत गोवारी<br>२. श्री. विरेश भरत गोवारी<br>३. श्री. निलेश भरत गोवारी | निरंक |
| | २६० कामोठे | कामाठे ९४ | २१३/३ | ०-५२-७ | | | | |
| | | | **एकूण संपादित क्षेत्र** | **१-९१-५** | | | | |
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| २ | तळोजा १३२ | २३५/२५० | २५४/१ब + २ब | ०-२८-९ | ३५५० चौ.मी. | भूखंड क्र. १, सेक्टर-१९, क्षेत्र ३२५३.२९ चौ.मी. | **१. कै. काळु नथु चौधरी (मयत) यांचे वारस**<br>**१) कै. तुळशिराम काळू चौधरी (मयत) यांचे वारस**<br>१.१) श्रीमती काळुबाई तुळशिराम चौधरी<br>१.२) श्री. यशवंत तुळशिराम चौधरी<br>१.३) श्री. अंकुश तुळशिराम चौधरी<br>१.४) श्री. सुभाष तुळशिराम चौधरी<br>१.५) श्रीमती चंद्रा बाळाराम ठाकुर<br>१.६) श्रीमती मंजुळा संतोष पाटील<br>१.७) श्रीमती लता जगदीश भोईर<br>२) धर्मा काळू चौधरी<br>३) ज्ञानदेव काळू चौधरी<br>४) मथूबाई काथोर चौधरी (मयत)<br>५) रामदास काथोर चौधरी<br>६) पांडुरंग काथोर चौधरी<br>७) अशोक काथोर चौधरी<br>**८) कै. भगवान काथोर चौधरी (मयत) यांचे वारस**<br>८.१) श्रीमती रंजना भगवान चौधरी<br>८.२) श्री. मनोज भगवान चौधरी<br>८.३) श्री. अक्षय भगवान चौधरी<br>९) चंद्रभागा सावळाराम कडु<br>१०) ठकाबाई बाळाराम चौधरी<br>११) लक्ष्मीबाई सुरेश शेळके<br>१२) उदय बाळाराम चौधरी<br>१३) सुवर्णा शशिकांत चौधरी<br>१४) रुशिकेश शशिकांत चौधरी<br>१५) सिमा शशिकांत चौधरी<br>१६) गिता उत्तम गायकर<br>१७) विदया नितीन कडू<br>१८) साखरुबाई दत्ता उर्फ दत्तात्रेय चौधरी<br>१९) सुनिल दत्ता उर्फ दत्तात्रेय चौधरी<br>२०) सुरेंद्र दत्ता उर्फ दत्तात्रेय चौधरी<br>२१) सरिता रमेश खानावकर<br>२२) सुमित्रा मोहन पाटील | निरंक |
| | | १०७ | २४५/०<br>२४८/३<br>२५९/१ | २-५९-०<br>०-४०-५<br>०-७९-९ | | | | |
| ३ | तरघर १३४९ | ७४ | ९८/३ | ०-६४-८ | एकूण मंजूर पात्रता ५५० चौ.मी. पैकी १५० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. २१९ बी, सेक्टर-१९, क्षेत्र १५० चौ.मी. | **१) कै. पांडुरंग उर्फ पांडु हिरु कोळी (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. बाळाराम पांडुरंग कोळी<br>२) श्री. तुकाराम पांडुरंग कोळी<br>**३) कै. दुकल्या पांडुरंग उर्फ पांडु कोळी (मयत) यांचे वारस**<br>अ) श्री. शरद दुकल्या कोळी | |
| | | | **एकूण** | **०-६४-८** | | | | |
| ४ | रोडपाली ३१९ | ३/५ रोडपाली | ७०/३ | ०-०९-४ | ५००० चौ.मी. | रोडपाली (कळंबोली) नोड येथील भुखंड क्र. ४१ ते ४६, सेक्टर-१६ क्षेत्र-४५४०.७२ चौ.मी. | **मुळ भूधारक कै. त्रिंबक जोमा ठाकूर (मयत) यांचे वारस**<br>**कै. मुक्ताबाई त्रिंबक ठाकूर (मयत)**<br>**कै. आत्माराम त्रिंबक ठाकूर(मयत)**<br>१) यशवंत आत्माराम ठाकूर<br>२) रविंद्र आत्माराम ठाकूर<br>३) विश्वजित आत्माराम ठाकूर<br>४) संतोष आत्माराम ठाकूर<br>५) शिरिष आत्माराम ठाकूर<br>६) सचिन आत्माराम ठाकूर<br>७) कै. दशरथ त्रिंबक ठाकूर (मयत)<br>७.१) सौ. अंजली निलेश पाटील<br>७.२) सौ. वैशाली गणेश पाटील<br>७.३) सौ. कविता विनायक मुंबईकर<br>७.४) सौ. रश्मी सुनिल बांधनकर<br>७.५) सौ. सीमा आशीष पाटील<br>७.६) श्री. चेतन दशरथ ठाकूर<br>८) किसन त्रिंबक ठाकूर<br>९) प्रभाकर त्रिंबक ठाकूर<br>१०) भारती भास्कर पाटील<br>११) चंद्रभागा तुकाराम म्हात्रे<br>१२) सुलोचना उर्फ सुनिता मोहन म्हात्रे<br>१३) आशा विश्वनाथ पाटील<br>१४) अनंता नारायण ठाकूर | |
| | | ३(१७) रोडपाली | ४१०/५ | ०-१९-० | | | | |
| | | २०/१ रोडपाली | ११८/०<br>१२८/०<br>१७०/२ | ०-३१-०<br>०-२६-१<br>०-२३-३ | | | | |
| | | ५८ रोडपाली | ७७/० | ०-२९-१ | | | | |
| | | ६२ रोडपाली | १५४/० | ०-१४-७ | | | | |
| | | ९४ आंबेतखार | ४३७/१ | ०-२३-३ | | | | |
| | | ९४ आंबेतखार | ४३७/७३ | ०-२५-३ | | | | |
| | | १०८ रोडपाली | ५४/० | ०-२२-५ | | | | |
| | | ११२ रोडपाली | ८६/१(२) | ०-१८-२ | | | | |
| | | १३२ रोडपाली | ४०४/१ | ०-०३-५ | | | | |
| | | ५८ रोडपाली | ५५/२(१)पै | ०-३९-९ | | | | |
| | | २४ रोडपाली | १५३/० | ०-२४-० | | | | |
| | | १०८ रोडपाली | २९८/० | ०-२४-८ | | | | |
| | | ३वाय रोडपाली | ७०/१/१ | ०-११-५ | | | | |
| | | १०० रोडपाली | ३६२/१/१ | ०-०६-३ | | | | |
| | | १३२ आंबेतखार | ४३७/१८ब | ०-४०-० | | | | |
| | | ३अ(२४) रोडपाली | ७६/१/१ | ०-२९-८ | | | | |
| | | २०/२ रोडपाली | १७७/०पै | १-२०-२ | | | | |
| | | १००ब रोडपाली | ३६२/३ | ०-०५-० | | | | |
| | | ९३ रोडपाली | ३२७/१ | ०-२४-२ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, सबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र/करारनामा करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१६८/२०२२-२३

# नवी मुंबईत बेकायदा फेरीवाल्यांची गर्दी

## रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांमुळे आरोग्य धोक्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरात फक्त ७२२६ अधिकृत परवानाधारक फेरीवाले असून कोरोना काळातील आर्थिक संकटानंतर बेकायदा फेरीवाल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यावर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने दिवसेंदिवस यात वाढ होत आहे. ऐन पावसाळ्यात बेकायदा रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

नवी मुंबईतील सर्वच विभागांत एकही रस्ता, चौक असा नाही की तेथे फेरीवाले व्यवसाय करीत नाहीत. २०१७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार शहरात नोंदणीकृत फेरीवाल्यांची संख्या ७२२६ इतकी आहे. नवी मुंबई शहरातील आठ विभागांत मोठ्या प्रमाणात बेकायदा फेरीवाल्यांनी ठाण मांडलेले पहावयास मिळते. सध्या पावसाळ्याच्या दिवस सुरू असताना



विविध साथीच्या रोगांना आमंत्रण देण्याचे काम उघड्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते करत असून बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा या सर्वच विभागात फेरीवाल्यांची संख्या सातत्याने वाढत आहेत. बेकायदा मटनशॉपही उदयास आली असून त्याच्या दरुगधीतून आरोग्याचे प्रश्न उभे राहू लागले आहेत. वाशी सेक्टर ९, १० परिसरातही फेरीवाल्यांची संख्या अधिक आहे.

शहरात बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी पालिकेने विभाग

**शहरात परवानाधारक फेरीवाल्यांची संख्या ७२२६ आहेत व अनेक फेरीवाल्यांची नोंदणी फेरीवाला धोरणानुसार प्रक्रियेत आहे. तसेच बेकायदा फेरीवाले, दुकाने याबाबत माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल.**
**-श्रीराम पवार, उपायुक्त परवाना**

कार्यालयांतर्गत कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. तसेच या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी या पथकाबरोबर सुरक्षारक्षकही नेमलेले असतात. त्यांच्या संरक्षणात बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई केली जाते. कारवाई करण्यासाठी पालिकेची गाडी येणार याची माहिती फेरीवाल्यांना अगोदरच मिळते. त्यामुळे पालिका आयुक्तांनी या कारवाईबाबत लक्ष देण्याची

| विभागवार अधिकृत फेरीवाले | |
|---|---|
| बेलापूर | ६५४ |
| नेरूळ | ९६४ |
| वाशी | ११३० |
| तुर्भे | ११३९ |
| ऐरोली | ६१२ |
| दिघा | ३५१ |
| घणसोली | ६४८ |
| कोपरखैरणे | १८२८ |

आवश्यकता आहे. नेरूळ, सीवूड्स, वाशी, कोपरखैरणेसह विविध विभागात पदपथ व्यापणाऱ्या फेरीवाल्यांकडून नागरिकांवर दादागिरी करण्याचे प्रकार वाढले आहेत.

# दिघ्यात संरक्षक भिंतीमुळे फुटपाथची दुरवस्था

**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा विभागातील मुकुंद कंपनीलगत रामनगरजवळ अमीन कंपनीने भूखंड क्र. बी-०१ येथे मोठ्या प्रमाणात संरक्षण भिंत बांधण्याचे काम चालू आहे. अमीन कंपनीच्या संरक्षण भिंतीचे काम करण्यात येत त्या भिंती लगतच महापालिकेने नागरिकांना ये-जा करण्यासाठी फुटपाथ बांधण्यात आलेला आहे, परंतु संरक्षण भिंतीच्या कामामुळे संपूर्ण फूटपाथची दुरवस्था ही झालेली आहे.



अमीन कंपनीने फुटपाथचा काही भाग हा संरक्षण भिंत बांधण्यासाठी वापरलेला आहे. त्यामुळे फुटपाथची जागादेखील कमी झालेली आहे. त्या अनुषंगाने महापालिकेने संपूर्ण खराब झालेल्या फुटपाथचा खरच हा खाजगी अमीन कंपनीकडून वसूल करावा तसेच महापालिकेच्या फुटपाथवर संरक्षण भिंत बांधल्यामुळे त्यांच्याकडून त्या जागेची किंमत वसूल करावी, अशी मागणी भाजपचे दिघा अध्यक्ष त्रिभुवनसिंग ठाकूर यांच्या माध्यमातून दिघा विभाग अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. या वेळी सामाजिक कार्यकर्ते सुभाष काळे, अमित मिश्रा, दीपक उपाध्याय, योगेश अभंग शिंदे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, प्रस्तुत प्रतिनिधीमार्फत अमीन कंपनीच्या व्यवस्थापनाशी संपर्क साधला असता त्यांनी यावर प्रतिक्रिया दिली नाही.

# नवी मुंबई महापालिकेतील १२० कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा निर्णय

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे पदोन्नती समितीने शिफारस केल्यानुसार वरिष्ठ लिपिक अथवा कर निरीक्षक पदावर कार्यरत ३० कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार अधिक्षक अथवा वसुली अधिकारी या पदावर तसेच लिपिक-टंकलेखक पदावर कार्यरत असलेल्या ९० कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार वरिष्ठ लिपिक अथवा कर निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्याचे आदेश आयुक्तांच्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात आलेले आहेत.

मागील बऱ्याच



वर्षांपासून हे कर्मचारी पदोन्नतीच्या प्रतिक्षेत होते. त्यामुळे आज १२० इतक्या मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा अपेक्षित लाभ मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कोरोना काळात कोविडमुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह निधी देणे, कोविड काळात कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष कोविड भत्ता देणे असे महत्त्वाचे कर्मचारी कल्याणकारी निर्णय आयुक्तांनी घेतले. त्याचप्रमाणे अधिकारी, कर्मचारी यांचे विविध प्रलंबित प्रश्न समजून घेऊन ते तत्परतेने मार्गी लावण्याच्या दृष्टीने नियोजन केले. पदोन्नती समितीला कार्यवाहीसाठी कालमर्यादा निश्चित करून देऊन आयुक्तांनी त्याचा सातत्याने आढावा घेतला.

त्यामुळे मागील दीड वर्षात ३३ संवर्गात २९० अधिकारी, कर्मचारी यांच्या पदोन्नत्या झालेल्या आहेत. यामध्ये वरिष्ठ पदांपासून संवर्ग ४च्या पदांपर्यंत सर्व संवर्गांना उचित न्याय मिळेल याची दक्षता घेण्यात येत आहे. आयुक्तांच्या निर्देशानुसार प्रामुख्याने आया, वॉर्डबॉय, प्लंबर, फिटर अशा वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीकडे विशेष लक्ष देण्यात आले. पदोन्नतीमध्ये आरोग्य, स्वच्छता, लेखा, अभियांत्रिकी, अग्निशमन, शिक्षण, प्रशासकीय सेवा अशा विविध विभागांतील अधिकारी, कर्मचारी यांना न्याय देण्यात आला.

मागील दीड वर्षात उपआयुक्त पदावर तीन, सहाय्यक आयुक्त पदावर सहा, कार्यकारी अभियंता पदावर सहा, लेखाधिकारी पदावर तीन, अग्निशमन केंद्र अधिकारी पदावर दोन पदोन्नत्या झालेल्या आहेत.

पदोन्नत्यांमध्ये आज लिपिक-टंकलेखक पदावरून वरिष्ठ लिपिक अथवा कर निरीक्षक पदावर झालेल्या ९० तसेच वरिष्ठ लिपिक अथवा कर निरीक्षक पदावरून अधिक्षक/वसुली अधिकारी पदावर पदोन्नती झालेल्या ३० अशा १२० कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या या मोठ्या प्रमाणात झालेल्या पदोन्नत्या आहेत. यापूर्वी स्टाफ नर्स संवर्गातून ४१ कर्मचाऱ्यांच्या सिस्टर इन्चार्ज पदावर सर्वाधिक पदोन्नत्या झालेल्या होत्या. त्याखालोखाल अधिक्षक पदावरील २३ कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय अधिकारी पदावर तसेच २२ उपस्वच्छता निरीक्षकांच्या स्वच्छता निरीक्षक पदावर पदोन्नत्या झालेल्या आहेत. याशिवाय ३३ संवर्गातील ३७२ अधिकारी, कर्मचारी यांना तीन लाभांची सुरक्षित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये 'गुड टच, बॅड टच'बाबत जनजागृती



**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ श्रीबाग तसेच तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाउंडेशन अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सक्षमीकरणा अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका संचलित माध्यमिक विद्यालय येथे नुकताच स्पर्शज्ञान (गुड टच ॲण्ड बॅड टच) या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम झाला.

या वेळी नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका माधुरी नारखेडे, शिक्षिका नीता लबडे, कांचन भोये, स्मिता साबळे, मनीषा जाधव, दीपिका भोईर, तसेच शिक्षिका व तेजस्विनी फाऊंडेशनच्या उपाध्यक्ष भाग्यश्री तांडेल यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शिका डॉ. निहा राऊत यांनी मुलींना व मुलांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श यांतील फरक विविध उदाहरणांच्या तसेच तक्त्यांच्या माध्यमातून समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. अशावेळी मुला-मुलींनी घ्यावयाची दक्षता, काळजी व तत्परता याविषयी मार्गदर्शन केले. तसेच मुला मुलींकडून त्यांच्या समस्या व प्रश्न जाणून घेऊन त्यांचे निरसन केले.

तेजस्विनी फाउंडेशनच्या सहसचिव राखी पाटील यांनी मुलांना स्पर्श कसा ओळखावा याविषयी मार्गदर्शन केले तर आजकाल सायबरच्या माध्यमातून गुन्ह्यांचे प्रमाण कसे वाढतात हे उदाहरणांच्या माध्यमातून सांगितले. तेजस्विनी फाउंडेशनच्या संस्थापिका जीविता पाटील यांनी प्रत्येकाने आपले विचार शुद्ध ठेवले पाहिजे, विचार चांगले असतील तर घडणारे आचरण चांगले असेल आणि अर्थातच आचरण चांगले असले म्हणजे आपल्याकडून घडणारी कृती चांगली होते त्यामुळे आपोआपच गुन्हे कमी होतील. सुसंस्कारित पिढी घडणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले. लायन्स क्लब ऑफ श्रीबाग अध्यक्ष कला पाटील, सचिव संदीप वारगे, खजिनदार अमित देशमुख यांचे सहकार्य लाभले. तसेच या वेळी डॉ. निहा राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त या वेळी विद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार शिक्षिका मनीषा जाधव यांनी केले.

# भावे नाट्यगृहात आईच्या स्मृतिप्रित्यर्थ कवितांचा कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रसिद्ध चित्र आणि रांगोळीकार, कला शिक्षक नवी मुंबई भूषण श्रीहरी पवळे यांनी आपल्या मातोश्री कै. कांताबाई, या स्वर्गवासी होऊन एक मास झाल्याने प्रथम मास पुण्यस्मरण म्हणून आईसाठी आईच्या कविता हा कार्यक्रम आयोजित केला होता.

नवी मुंबईतील कवींना सोबत घेऊन वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहातील तालीम हॉलमध्ये १७ तारखेस रविवारी सकाळी साजरा केला. कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला. यात वय वर्ष ११ ते ७५ वय असलेल्या



कवी, कलाकार मंडळींनी सहभाग घेऊन प्रत्येकाने आपापल्या आईबद्दल कविता सादर करून कधी डोळ्यात पाणी तर कधी हसू देखील आणले. छोटा बालकवी प्रसाद माळीने, आई तू मायेचा सागर गाऊन टाळ्या घेतल्या. तर सक्षमनेदेखील गोड कविता ऐकवली. रुद्राक्ष या तरुण युवाकवी यांनी लोककवी प्रशांत मोरे यांची कविता गाऊन डोळ्यात पाणी आणले. कवी शंकर गोपाळे, नारायण पाटील, अरविंद पाटील, मधुकर वारभूवन, सुरेंद्र पारवे, विकास गायकवाड, दादासाहेब पाडळकर, माधवी मोतलिंग, भाऊसाहेब आहेर,पंकज बोऱ्हाडे, शितल पवार, लक्ष्मीकांत पोफळे सहभागी झाले होते.

कवी जितेंद्र लाड यांनी कार्यक्रमात शेवटी माझे जगण्याचं बळ या आपल्या काव्य संग्रहातील आईची प्रसिद्ध कविता सादर करून कार्यक्रमात बहर आणली. कार्यक्रमास कविता डॉट कॉम चे बरेच कवी हजर होते.सूत्रसंचालन शिव व्याख्याते प्रा. रवींद्र पाटील यांनी केले.

# उरण येथे दिव्यांगांची तपासणी आणि प्रमाणपत्र वितरण उपक्रम

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

अंत्योदय मोहिमेंतर्गत रायगड जिल्ह्याची निवड करण्यात आली असून या मोहिमेचा एक भाग म्हणून दिव्यांग व्यक्तींना त्यांचे प्रलंबित दिव्यांग प्रमाणपत्रे तातडीने मिळावीत यासाठी जिल्हा रुग्णालय अलिबागमार्फत इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण येथे दिव्यांग प्रमाणपत्र वितरण शिबिर मंगळवारी (दि. १२) सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते.



जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड-अलिबाग आयोजित उरण तालुक्यातील दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणासाठी दिव्यांगत्वाचे वैदकीय प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या शिबिरात अस्थिव्यंग नेत्र विकार व मानसिक आजार याची तपासणी केली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली व इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. गौतम देसाई, सहाय्यक अधिक्षक अनिल ठाकूर यांच्या सहकार्याने शिबिर यशस्वी झाले त्यात अलिबाग येथील सोशल वर्कर प्रतिमा फडतरे, ग्रामीण रुग्णालय टीम, अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय टीमने विशेष मेहनत घेतली.

या शिबिरात मानसिक विभाग १६ प्रमाणपत्र वाटप, अस्थिव्यंग १७ प्रमाणपत्र वाटप, मानसिक आजार चार प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. एकूण ५६ दिव्यांगांची तपासणी करण्यात आली.उरण तालुक्यातील दिव्यांगांनी तपासणी व प्रमाणपत्र ज्यांना पाहिजे असेल त्यांनी WWW.Swavlambancard.gov.inवर नोंदणी करावी, असे इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैदकीय अधीक्षक डॉ. गौतम देसाई यांनी सांगितले.

## निवडक

### नवीन पनवेल येथून तरुण बेपत्ता

**पनवेल :** नवीन पनवेल, सेक्टर ६ येथून नोकरीला जातो असे सांगून घराबाहेर गेलेला २५ वर्षीय रोहित जयवंत जाधव हा घरी न आल्याने तो हरवला असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या तरुणाची उंची पाच फूट, सहा इंच, चेहरा उभट, वर्ण सावळा आहे. तो अंगाने मध्यम असून त्याला हिंदी, मराठी भाषा अवगत आहे. त्याने काळा शर्ट, निळी जीन्स व पायात चप्पल घातलेली आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याचे नाईक नवनाथ लवटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रामेश्वर महाराज नरे यांना पुरस्कार

**पनवेल :** मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी मुंबई यांचे वतीने रामेश्वर महाराज नरे यांना राज्यस्तरीय गुणिजनरत्न जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी मुंबई यांच्या वतीने सांस्कृतिक सभागृह, मुंबई शहर येथे संमेलन समन्वयक मनिष कदम व किर्तनकार, कवी, पत्रकार ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर यांच्या हस्ते रामेश्वर महाराज से यांना राज्यस्तरीय गुणिजनरत्न जीवनगौरव पुरस्कार-२०२० हा पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. मिळालेल्या या पुरस्काराबाबत रामेश्वर महाराज नरे यांचे सर्व स्तरामधून अभिनंदन होत आहे.





# 'लायन्स'च्या नवी मुंबईतील तीन क्लबचा पदग्रहण सोहळा


**उरण : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ उलवे जेम्स, लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई आगरी कोळीवाव लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी या तीनही क्लबच्या पदग्रहण सोहळ्याचा भव्य दिव्य समारंभ गोरक्षनाथ मंदिर येथे झाला.

गतवर्षीचे अध्यक्ष एमजेएफ मिलिंद पाटील, श्रीकांत पाटील व संदीप म्हात्रे यांनी पदग्रहण सोहळ्याच्या कार्यक्रमात सर्व लायन्सच्या डिस्ट्रिक पदाधिकाऱ्यांना आमंत्रित केले होते. यावर्षीचे लायन्स क्लब ऑफ उलवे जेम्सच्या नवनियुक्त अध्यक्ष गौरी देशपांडे, लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई आगरी कोळीचे नवनियुक्त अध्यक्ष महेंद्र सुतार व लायन्स क्लब ऑफ द्रोनागिरीचे नवनियुक्त अध्यक्ष संदीप म्हात्रे यांचे लिओ क्लब ऑफ द्रोनागिरीच्या कलाकारांनी ढोल ताशाच्या गजरात धुमधडाक्यात स्वागत केले.

पदग्रहण सोहळ्याचे इंडक्शन ऑफिसर पीएमजेएफ एन. आर. परमेश्वरन, प्रमुख पाहुणे व इन्स्टॉलेशन ऑफिसर पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पीएमजेएफ अनिल जाधव यांची उपस्थिती लाभली. प्रमुख अतिथी मुंबई एपीएमसी अध्यक्ष राजेंद्र पाटील व झोन चेअरपर्सनला रमाकांत म्हात्रे यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावना केली. एमजेएफ विजय पाटील यांनी नवी मुंबई आगरी कोळी क्लबच्या वतीने आपले मनोगत व्यक्त केले. संदीप म्हात्रे यांनी लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरीच्या वतीने आपले मनोगत व्यक्त केले. तीनही क्लबच्या वतीने रायगड मधील सहा अंगणवाडींना शैक्षणिक खेळणी व साहित्य देऊन संयुक्तपणे स्तुत्य उपक्रम करण्यात आला.

नवनिर्वाचित अध्यक्षला गौरी देशपांडे यांनी आपल्या पदस्वीकृती अध्यक्षीय भाषणात नाविन्यपूर्ण समाजोपयोगी उपक्रम करणार असल्याचे जाहीर केले . तसेच दोन्ही क्लबच्या अध्यक्षांनी सुद्धा त्यांच्या पुढील उपकर्माबद्दल माहिती दिली.

दैनिक राम प्रहरच्या अंकात नवे पाक्षिक सदर 'वाचाल तर वाचाल!' सुरू झालेले आहे.
या सदरात
साहित्यिकांची आवडती पुस्तके दर महिन्याच्या पहिल्या व चौथ्या रविवारी
आपल्या भेटीला आणत आहोत.
आपला अंक राखून ठेवा...!

# अलिबाग समुद्र किनाऱ्याचा बंधारा उखडला



**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील आठवड्यात आलेल्या उधाणाच्या लाटांच्या माऱ्यामुळे अलिबाग समुद्र किनाऱ्यावरील बंधारा उखडला गेला आहे. या बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून किनाऱ्यावरील सेल्फी पॉईंटदेखील मोडला आहे.

तीन दिवसांपासून समुद्राला मोठी भरती आली. उधाणाच्या भरतीचा अलिबाग किनारपट्टीवरील भागाला तडाखा बसला. भरतीच्यावेळी महाकाय लाटा किनाऱ्यावर धडकत होत्या. ज्यामुळे अलिबाग समुद्र किनाऱ्यावरील बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. समुद्र किनाऱ्यावरील पर्यटकांचे आकर्षण असलेला अलिबाग बीच या अक्षरांचा सेल्फी पॉईंटदेखील लाटांच्या तडाख्याने उखडला गेला. बंधाऱ्यावर बसविण्यात आलेल्या फरश्या लाटांच्या माऱ्यामुळे उखडून गेल्या. बंधाऱ्याच्या रॅम्पची वाताहत झाली आहे.

दरम्यान, उखडलेल्या बंधाऱ्याची पहाणी करण्यात आली. अलिबाग बीच अक्षरांची तातडीने दुरूस्ती करण्याच्या सूचना या वेळी देण्यात आल्या. नगरपालिकेकडून बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे तातडीने सुरू व्हावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# कर्जतच्या पोसरी-साळोख रस्त्याची दुरवस्था; वाहनचालक, प्रवासी त्रस्त



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील मुरबाड रस्त्यावरील आरवंद गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची पावसात दुरवस्था झाली आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून तयार करण्यात आलेल्या या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून संबंधित अधिकाऱ्यांनी या रस्त्याच्या कामाची दक्षता आणि गुण नियंत्रक विभागाकडून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी या भागातील वरई ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच दीपक धुळे यांनी केली आहे.

कर्जत-मुरबाड या राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर पोसरी गावापासून आरवंद-साळोख गावाकडे जाणारा रस्ता खराब झाला होता. गेली अनेक वर्षे या रस्त्याची दुरावस्था झाल्याने स्थानिक या रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी करीत होते. शेवटी या चार किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरणाचे काम महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनामधून करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार २०२२मध्ये या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले. मात्र या रस्त्याचे काम चांगल्या प्रतीचे झाले नाही, असा स्थानिक ग्रामस्थ दीपक धुळे यांचा आरोप आहे. हा रस्ता पावसाच्या पहिल्या महिन्यात खराब झाला आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनदेखील काही महिन्यात रस्त्यावर खड्डे पडले असल्याने स्थानिकांनी कामाच्या दर्जाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. या रस्त्याच्या कामाची शासनाच्या दक्षता आणि गुण नियंत्रक विभाग यांच्याकडून चौकशी व्हावी, अशी मागणी दीपक धुळे यांनी केली आहे.

# एम इंडिकेटरवर नेरळ जंक्शनचे नाव गायब

## नेरळ लब्धी गार्डन असे नामकरण; प्रवासीवर्गात संतप्त प्रतिक्रिया

**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वेच्या दफ्तरी जंक्शन रेल्वे स्थानक अशी नोंद असलेल्या नेरळ स्थानकाचे नाव एम इंडिकेटरवर नेरळ-लब्धी गार्डन असे दर्शविले जात आहे. त्याबद्दल नेरळमधील प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

ब्रिटिशांनी भारतात पहिल्यांदा रेल्वे आणली. त्यानंतर केवळ तीन वर्षांनी नेरळ या स्थानकात रेल्वेगाडी आली आहे. १८५६मध्ये बोरीबंदर-ठाणेदरम्यान रेल्वे सुरु झाली आणि १८५९मध्ये नेरळच्या मालधक्क्यावर रेल्वेगाडी पोहचली होती. मुंबईतील आदमजी पीरभॉय यांनी नेरळ येथून माथेरानला जाण्यासाठी नॅरोगेज मार्ग शोधून काढला आणि नेरळ हे १९०७मध्ये जंक्शन रेल्वेस्थानक बनले. माथेरान या पर्यटनस्थळासाठी याच स्थानकातून मिनीट्रेन सोडली जाते. असे महत्त्व असलेल्या नेरळ रेल्वेस्थानकाची माहिती एम इंडिकेटरवर नेरळ-लब्धी गार्डन अशी दाखविली जात आहे. लोकल गाड्यांचे बदललेले वेळापत्रक याची माहिती प्रवासी एम इंडिकेटरवरून घेत असतात. या एम इंडिकेटरवर नेरळ स्थानकांच्या पुढे असलेला जंक्शन हा शब्द गायब झाला असून तेथे लब्धी गार्डन असे दर्शविले जात आहे. त्यात लब्धी गार्डन हा गृहप्रकल्प नेरळ स्थानकापासून चार किलोमीटर अंतरावर असून तो प्रकल्प नेरळ ग्रामपंचायत हद्दीतदेखील नाही. त्यामुळे एम इंडिकेटरवरील नेरळ लब्धी गार्डन या नावाबद्दल नेरळ प्रवासी संघटनेने संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

**नेरळ नावापुढे लब्धी गार्डन हे दिसत आहे. परंतु ती जाहिरात असून नेरळ रेल्वे स्थानक जंक्शन स्थानक हे नाव कायम आहे. लब्धी गार्डन असे बदलले नसून ती जाहिरात आहे, हे समजून घ्यावे.**
**-सचिन टेके, निर्माते, एम-इंडिकेटर**

आमच्या स्थानकाचे नाव बदलण्याचा अधिकार एम इंडिकेटरला कोणी दिला. खासगी संस्थांची नाव ऐतिहासिक महत्त्व असलेल्या नेरळ रेल्वेस्थानकाच्या नावापुढे असून ते नाव तत्काळ काढण्यात यावे, अशी मागणी प्रवासी संघटनेचे अध्यक्ष संदीप म्हसकर यांनी केली आहे. एम इंडिकेटर यांना जर नेरळ स्थानकाचे नाव बदलायचे असेल, तर हुतात्मा हिराजी पाटील रेल्वेस्थानक असे दर्शवावे, अशी सूचनादेखील म्हसकर यांनी केली आहे.

# सुभाष नगर, मस्को कॉलनी, लव्हजी, चिंचवली परिवहन सेवा पुन्हा चालू करावी; भाजपचे राहुल जाधव यांची मागणी



(छाया : अरुण नलावडे)

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली गाव ते वासरंग-मस्को कॉलनी (सुभाष नगर)-स्टाफ कॉलनी सर्कल (जगदीश नगर)-लव्हजी-चिंचवली ही सिटी बस सेवा लॉकडाऊनमध्ये बंद करण्यात आली होती. या मार्गावर पुन्हा सिटी बस सेवा सुरू करावी, अशी मागणी भाजप युवानेते राहुल जाधव यांनी खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्याकडे बुधवारी (दि. २०) निवेदनाद्वारे केली.

खोपोलीचे माजी उपनगराध्यक्ष स्व. सखाराम जाधव यांनी १९८५ साली सुभाष नगर-मस्कॉ कॉलनी-लव्हजी-चिंचवली या मार्गावर सिटी बस सेवा सुरू करून घेतली होती. सुभाष नगर आणि परिसरातील कामगार, विद्यार्थी, महिला या परिवहन सेवेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेत होते. लॉकडाऊनमध्ये खोपोली नगर परिषदेने सिटी बस सेवा बंद केली होती.

खोपोली, शहरात, लोणावळा व खालापूर तालुक्यातील काही मार्गावर सिटी बस धाऊ लागल्या आहेत. मात्र सुभाष नगर-मस्को कॉलनी-लव्हजी-चिंचवली या मार्गावर अद्यापही सिटी बस सेवा सुरू झालेली नाही. या मार्गावरील जेसीएमएम स्कूल (मस्को कॉलनी) सुरू झाले आहे. खोपोली शहरातील एकमेव स्वामी अय्यप्पा मंदिर सुभाष नगर येथे आहे. तसेच शंकर मंदिर, हनुमान मंदिर, साईबाबा मंदिर, गणेश मंदिर, नुराणी मस्जिद, समाज मंदिर या ठिकाणी नेहमी भाविकांची वर्दळ असते. त्यामुळे सुभाष नगर (जाधव मामा चौक) येथे सिटी बस आल्यास त्याचा उपयोग येथील सर्व नागरिकांना नक्कीच होईल, असे जाधव यांनी निवेदनात नमुद केले आहे.

सुभाष नगर-मस्को कॉलनी-लव्हजी-चिंचवली या मार्गावर सिटी बस सेवा सुरू करण्याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी भाजप युवानेते राहुल जाधव यांनी बुधवारी खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक अनुप दुरे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



(छाया : धम्मशील सावंत)

# आपटवणे शाळेत आरोग्यविषयक जनजागृती

## प्राईड इंडिया संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना हायजेनिक किट, ग्रामस्थांना पिशव्या वाटप

**पाली : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य विषयक जनजागृती व्हावी त्यांना आरोग्याचे महत्त्व कळावे आणि आरोग्याची गोडी लागावी या उद्देशाने दि प्राईड इंडिया या संस्थेने आपटवणे (ता. सुधागड) येथील राजीप शाळेतील विद्यार्थ्यांना नुकतेच हायजेनिक कीटचे वाटप केले.

आपटवणे सरपंच शरद चोरघे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा वैशाली केदारी, सदस्या नेहा भिसे, मयुरी दंत व सारिका दंत उपस्थित होत्या. शिक्षक राजेंद्र पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या वेळी ग्रामस्थ व पालकांना मजबूत आणि टिकाऊ जम्बो पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

मुख्याध्यापिका प्रमिला म्हात्रे यांनी दि प्राईड इंडिया संस्थेचे प्रोजेक्ट मॅनेजर वसंत मोरे आणि संस्थेच्या उपक्रमशील शिक्षिका रजनी राऊत यांचे आभार मानले. या वेळी सरपंच शरद चोरघे यांनी शाळेला फरशी बसवण्याचे आश्वासन दिले.

# 'पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेसाठी केवायसी सादर करा'

**मुरुड : प्रतिनिधी**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांनी ३१ जुलैपर्यंत आपल्या बँकेत आणि ऑनलाइन पोर्टरवर केवायसी करून शासनाच्या उपक्रमास सहकार्य करावे, आवाहन मुरुडचे नायब तहसीलदार गोविंद कौटुंबे यांनी केले आहे.

केंद्र शासनाकडून पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळत असते. ही आर्थिक मदत सुरु राहण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी ३१जुलैपर्यंत केवायसी करणे अनिवार्य आहे. जे शेतकरी केवायसी करणार नाहीत त्यांच्या खात्यात हप्त्याची रक्कम वितरित करता येणार नाही. त्यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांनी केवायसी करणे गरजेचे असल्याचे कौटुंबे यांनी सांगितले.

मुरूड तालुक्यातील शेतकऱ्यांनी जवळच्या सेतू कार्यालय अथवा ग्रामपंचायतीमध्ये सीएससी सेंटर कार्यालयात जाऊन लवकरात लवकर केवायसी करून घ्यावे, आवाहन नायब तहसीलदार कौटुंबे यांनी केले.

# कोलाडच्या डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयात सापांविषयी जनजागृती

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोलाड येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि. १९) राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सापांविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना पोस्टरद्वारे सापांविषयी माहिती देण्यात आली. त्यामध्ये नाग, घोणस, फुर्श्या आदी विषारी सापांचा समावेश होता तर धामण, मांडूळ आदि बिनविषारी सापांविषयी सर्पमित्र प्रथमेश राक्षीकर, नीरज म्हात्रे व नितेश लोखंडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

प्राध्यापक अनिरुद्ध मोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. शंकर मुंडे, प्रा. सतीश सावळे, प्रा. नेहल प्रधान, प्रा. रेश्मा शेळके, प्रा. जयवंती अडळीकर यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.



(छाया : महादेव सरसंबे)

# पोलादपुरात बूस्टर डोसला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पहिल्या आणि दुसऱ्या कोरोना प्रतिबंधक डोसनंतर आता तिसऱ्या बूस्टर डोसला पोलादपूर शहरात चांगलाच प्रतिसाद मिळू लागला आहे. मंगळवारी (दि. १९) शहरातील स्वामी कवींद्र परमानंद मठगल्ली येथून बूस्टर डोसची सुरुवात झाली.

पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या कोविड लसीकरण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गेल्या वर्षीदेखील स्वामी कवींद्र परमानंद मठगल्ली येथे कोविड लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सिनचा पहिला व दुसरा डोस या शिबिरामध्ये देण्यात आला होता. यानंतर मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात तिसरा बूस्टर डोस देण्यात आला. या शिबिरामध्ये पोलादपूर शहरातील मुख्यत: मठगल्ली आणि बाजारपेठ येथील व्यापारी तसेच महिला व ज्येष्ठ नागरिकांसह सुमारे दिडशे नागरिकांनी लसीकरण करून घेतले.

पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. भाग्यरेखा पाटील व डॉ. राजेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिपरिचरिका स्वप्नाली गांधी व परिचारिका अश्विनी चिपळूणकर यांनी नागरिकांचे लसीकरण केले.

# कर्जत रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी सतीश श्रीखंडे



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी सतीश श्रीखंडे तर सचिवपदी विशाल शहा यांची निवड करण्यात आली. खजिनदारपदाची जबाबदारी अरविंद जैन यांच्याकडे सोपविण्यात आली.

कर्जतमधील राज कॉटेजच्या सभागृहात रोटरी क्लबच्या पदग्रहण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे येथील अमित जाधव यांच्या समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. मावळते अध्यक्ष समीर सोनी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सचिव सचिन ओसवाल यांनी दृक्श्राव्य पद्धतीने वार्षिक अहवाल सादर केला. जितेंद्र ओसवाल आणि ठकेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर अध्यक्षपदाची सूत्रे सतीश श्रीखंडे तर सचिवपदाची सूत्रे विशाल शहा यांच्याकडे सोपविण्यात आली. श्रीखंडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रांतपाल अविनाश कोळी, अमित जाधव यांनी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन हुसेन जमाली यांनी केले. कर्जतचे माजी नगराध्यक्ष राजेश लाड, डॉ. मनोहर साबणे, डॉ. प्रेमचंद जैन, राहुल वैद्य, दीपक पाटील, दत्तात्रेय श्रीखंडे, प्रभाकर चव्हाण, योगेश राठी, दिपचंद जैन, प्रभाकर बडेकर, सूर्याजी ठाणगे, साईनाथ श्रीखंडे, ज्ञानेश्वर कडू, सुमित बैलमारे, स्नेहा श्रीखंडे, मुकुंद भागवत, समीर सोहनी यांच्यासह क्लबचे सदस्य या वेळी उपस्थित होते.

## आशियाई शरीरसौष्ठव स्पर्धा

# भारताच्या आणखी दोघांना 'सुवर्ण'



- बलदेव कुमार आणि तरुण चॅटर्जी यांची सोनेरी कामगिरी
- दोन सुवर्णांसह एकूण ११ पदकांची लयलूट

**माफुशी (मालदीव) : वृत्तसंस्था**

५४व्या आशियाई शरीरसौष्ठव स्पर्धेच्या मास्टर्स गटात भारतच गोल्ड मास्टर ठरला. सुभाष पुजारींपाठोपाठ बलदेव कुमार यांनी ५० ते ६० वर्षे वयोगटात, तर तरुण कुमार चॅटर्जी यांनी ६० ते ७० वर्षे गटात सोनेरी कामगिरी करीत भारताला आणखी दोन सुवर्ण पदके जिंकून दिली. विशेष म्हणजे पुजारींप्रमाणे बलदेव कुमारही पोलीस निरीक्षक आहेत. भारताने स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी दोन सुवर्ण पदकांसह सहा रौप्य आणि तीन कांस्यपदके जिंकत ११ पदकांची कमाई केली.

भारताच्या मास्टर्स खेळाडूंनी खऱ्या अर्थाने कमाल केली. चंदीगडचे ५३ वर्षीय पोलीस निरीक्षक बलदेव कुमार यांनी ५० ते ६० वर्षे वयोगटाच्या ८० किलोवरील वजनी गटात तरुणांनाही लाजवेल असे शरीरसौष्ठवाचे प्रदर्शन करीत बाजी मारली. या गटात सत्यनारायण राजू दुसरे आले. त्यानंतर झालेल्या ६० वर्षांवरील वजनी गटात ६६ वर्षीय तरूण कुमार चॅटर्जी यांनी सोनेरी यश संपादले. या गटात ७३ वर्षीय व्ही. रथिनम यांची पीळदार शरीरयष्टी पाहून उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे कौतुक केले. भारताने मास्टर्स शरीरसौष्ठवाच्या पाचही गटात पदके जिंकली. विशेष म्हणजे तीन सुवर्णपदकांसह तीन रौप्य आणि दोन कांस्य अशी एकूण आठ पदकांची कमाई भारताच्या मास्टर्सने केली. आता शरीरसौष्ठवाच्या मुख्य गटातही भारतीय दिग्गजांकडून अशाच कामगिरीची अपेक्षा आहे.

तीन गटांत भारताला एकही सुवर्ण जिंकता आले नसले तरी ५५ किलो वजनी गटात आर. के सुरेशने, तर ६५ किलो वजनी गटात बिचित्र नायकने रौप्य जिंकले. ६० किलो वजनी गटात एम. विघनेश कांस्यपदकाचा मानकरी ठरला.

# महाराष्ट्राच्या हर्षदाची 'गरुड'भरारी

- आशियाई युवा वेटलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राची उदयोन्मुख वेटलिफ्टिंगपटू हर्षदा गरुडने आशियाई युवा आणि कनिष्ठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत महिलांच्या ४५ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले. १८ वर्षीय हर्षदाने १५७ किलो (६९ किलो ८८ किलो) वजन उचलले. कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील १५३ किलोच्या (७० किलो ८३ किलो) कामगिरीहून हर्षदाची ताजी कामगिरी चार किलोहून सरस राहिली.

युवा विभागातील ४५ किलो वजनी गटात सौम्या दळवीने कांस्यपदक जिंकले. युवा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या सौम्याने १४५ किलो (६३ किलो ८२ किलो) वजन उचलले. पुरुषांच्या ४९ किलो वजनी गटात एल. धनुशने स्नॅच विभागात (८५ किलो) चमक दाखवत कांस्यपदक पटकावले. १८५ किलोसह (८५ किलो १०० किलो) तो एकूण चौथ्या स्थानावर होता. आंतरखंडीय आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत स्नॅच तसेच क्लीन आणि जर्कसाठी वेगवेगळी पदके दिली जातात, मात्र ऑलिम्पिकमध्ये एकूण वजन उचलण्यासाठी पदक देण्यात येते.

हर्षदा सध्या तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी विद्यालयात कला शाखेच्या प्रथम वर्षात शिकत असून बिहिरीलाल दुबे यांच्या वडगाव मावळ येथील दुबेज गुरुकुल येथे वेटलिफ्टिंगचे प्रशिक्षण घेत आहे.

यापूर्वी तिने आसाममधील खेलो इंडिया युवा स्पर्धेत सुवर्णपदक पतियाळा येथील राष्ट्रीय सब-ज्युनियर स्पर्धेत रौप्यपदक, पतियाळा आणि ओडिशा येथील राष्ट्रीय ज्युनिअर स्पर्धेत कांस्यपदक, जागतिक ज्युनियर स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करीत सुवर्णपदक जिंकले आहे. विशेष म्हणजे मिशन ऑलिम्पिक २०२४/२८ एक्सलन्सकरिता तिची निवड झालेली आहे.

# विराट कोहली महान खेळाडू

## इंग्लंडच्या बेन स्टोक्सकडून तोंडभरून कौतुक



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा अष्टपैलू क्रिकेटपटू बेन स्टोक्सने भारताचा तारांकित माजी खेळाडू विराट कोहलीची प्रशंसा केली आहे. विराट हा सर्वकालीन महान खेळाडूंपैकी एक असल्याचे स्टोक्सने म्हटले आहे.

स्टोक्सने एकदिवसीय क्रिकेटमधून तडकाफडकी निवृत्ती घेतली. मंगळवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तो आपला शेवटचा एकदिवसीय सामना खेळला. शेवटच्या सामन्यात मैदानात उतरताना स्टोक्स भावूक झाला होता. त्यापूर्वी स्काय स्पोर्ट्सला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्याने विराट कोहलीबाबत मोठे वक्तव्य केले आहे.

बेन स्टोक्सने निवृत्तीची घोषणा केल्यानंतर विराट कोहलीने इन्स्टाग्रामवर एक कमेंट केली होती. स्टोक्स हा सर्वोत्तम प्रतिस्पर्धी खेळाडूंपैकी एक आहे, असे कोहली म्हणला होता. त्यानंतर स्टोक्सने 'स्काय स्पोर्ट्स'शी बोलताना सांगितले की, विराट कोहली क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमधील महान खेळाडूंपैकी एक आहे. तो एक उत्कृष्ट खेळाडू आहे. मला त्याच्यासारख्या खेळाडूविरुद्ध खेळायला खूप आवडते. मी नेहमीच त्याची उर्जा आणि खेळाप्रतीच्या बांधिलकीची प्रशंसा केली आहे. मला खात्री आहे की, आम्ही मैदानावर एकमेकांविरुद्ध आणखी क्रिकेट खेळू. विराटचे विचार ऐकून फार आनंद झाला.

भारताचा माजी कर्णधार विराट कोहली सध्या वाईट फॉर्मशी झगडताना दिसत आहे. अनेकांनी त्याच्यावर टीका सुरू केली आहे. अशा परिस्थितीमध्ये बेन स्टोक्सने त्याला सर्वकालीन महान खेळाडू म्हटले आहे.

### आशियाई क्रीडा स्पर्धा पुढील वर्षी २३ सप्टेंबरपासून

**बीजिंग : वृत्तसंस्था**

लांबणीवर पडलेली आशियाई क्रीडा स्पर्धा पुढील वर्षी २३ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत हांगझो येथे होणार आहे, अशी घोषणा आशियाई ऑलिम्पिक परिषदेने केली. आशियाई स्पर्धेचे १९वे पर्व १० ते २५ यंदा सप्टेंबरदरम्यान होणार होते, पण चीनमधील कोरोनाच्या साथीमुळे ही स्पर्धा पुढे ढकलण्यात आली.

चीन ऑलिम्पिक समितीकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार कृती दलाकडून गेले दोन महिने हांगझो आशियाई क्रीडा स्पर्धा संयोजन समिती आणि अन्य भागधारकांशी तारखांसदर्भात चर्चा सुरू होती. अन्य आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या वेळापत्रकांचा अंदाज घेऊनच कृती दलाने सुचवलेल्या तारखांना संयोजन समितीने मंजुरी दिली आहे.

# राष्ट्रकुल स्पर्धेत भाग घेणाऱ्या भारतीय खेळाडूंना पंतप्रधान मोदींकडून शुभेच्छा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बर्मिंगहम येथे होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या भारतीय खेळाडूंना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि. २०) व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांनी खेळाडूंशी संवाद साधताना आपले सर्वस्व पणाला लावून खेळा, असे सांगितले.



पंतप्रधान नरेंद्र म्हणाले की, माझ्यासाठी हा आनंदाचा क्षण आहे की मला तुमच्या सर्वांशी भेटण्याची संधी मिळाली. तुमच्यापैकी अनेक लोक हे विदेशात सराव करीत आहेत. मीदेखील संसद सत्रामध्ये व्यग्र आहे. आज २० जुलै आहे. क्रीडाजगतासाठी आजचा दिवस खूप महत्त्वाचा आहे. आज आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिवस आहे. ज्या दिवशी राष्टकुल स्पर्धा सुरु होणार आहे त्याच दिवशी तामिळनाडूमध्ये चेस ऑलिम्पियाड सुरू होणार आहे. भारतीय खेळाडूंकडे जगावर आपली छाप सोडण्याची संधी आहे.

पंतप्रधान पुढे म्हणाले की, तुम्ही मन लावून खेळा, सर्वस्व द्या, संपूर्ण शक्तीनिशी खेळा. याचबरोबर कोणताही दबाव न घेता खेळा. वेळेच्या अभावामुळे आपण समोरासमोर भेटू शकत नाही, पण ज्या वेळी तुम्ही तेथून परताल त्या वेळी आपण नक्की भेटू.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'आजचा हा काळ भारतीय क्रिकेट इतिहासासाठी एका दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा आहे. आज तुमच्यासारख्या खेळाडूंचा आत्मविश्वास जबरदस्त आहे. तुमचा सरावदेखील चांगला सुरू आहे. देशात खेळाविषयीचे वातावरण जबरदस्त आहे आणि तुम्ही सगळे शिखरावर पोहचत आहात, नवे विक्रम करीत आहात. जे खेळाडू पहिल्यांदा मोठ्या स्पर्धेत भाग घेत आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की मैदान बदलले आहे. तुमचा अंदाज नाही, तुमची जिद्द नाही. उद्देश एकच आहे तिरंगा फडकवणे, राष्ट्रगीताची धून ऐकणे. त्यामुळे दबाव घेऊ नका चांगल्या आणि दमदार खेळाने इतरांवर छाप सोडा.'

# टीम इंडियाची प्रशिक्षकासह धमाल

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंडमध्ये एकदिवसीय आणि टी-२० मालिका जिंकल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ आता वेस्ट इंडिज दौऱ्यावर पोहचला आहे. भारतीय संघाला तिथेही एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळायच्या आहेत. कर्णधार शिखर धवन आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या सोबत निवड झालेले खेळाडू त्रिनिदादमध्ये दाखल झाले. या दरम्यान एक व्हिडीओ समोर आला आहे, ज्यामध्ये प्रशिक्षक द्रविडला खेळाडूंनी चक्क आपल्या तालावर नाचवल्याचे दिसत आहे.

भारतीय संघाला २२ जुलैपासून वेस्ट इंडिजविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळायची आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची धुरा शिखर धवनकडे देण्यात आली आहे. धवन आपल्या मस्तीखोर स्वभावासाठी ओळखला जातो. मजेशीर व्हिडीओ तयार करून सोशल मीडिया पोस्ट करणे हा त्याचा आवडता छंद आहे. अनेकदा सहकारी खेळाडूंसोबत तो व्हिडीओ करताना दिसतो. खेळाडूही या मजेशीर व्हिडीओमध्ये सहभाग घेतात. या वेळी प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी त्यांना साथ दिली आहे.

अतिशय शांत व धीरगंभीर असलेला राहुल द्रविड अशा प्रकारच्या डान्स ॲक्टिव्हिटीपासून कायम चार हात लांबच असतो, परंतु या वेळी खेळाडूंनी त्यालाही आपल्या डान्स व्हिडीओत सहभागी करून घेतले.

# पॉवरलिफ्टींगमध्ये अथर्व, कुणाल, अक्षय विजेते

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हास्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा पनवेल येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत सब ज्युनिअर गटात पेण येथील संसारे फिटनेसचा कुमार अथर्व लोधी, ज्युनिअर स्पर्धेत कुमार कुणाल पिंगळे (बीवायएफसी, जिम खोपोली) आणि सीनिअर पुरुष गटात अक्षय शांनमुगम्म (खोपोली, आयरनमिट जिम) विजेता ठरला.



स्पर्धा रायगड जिल्हा पॉवरलिफ्टिंगचे कार्याध्यक्ष यशवंत मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली व्ही. के. हायस्कूल येथे झाली. या स्पर्धेत जिल्ह्यातील पेण, खोपोली, माणगाव, उरण, रसायनी या विभागातील जवळजवळ ५० खेळाडूंनी भाग घेतला होता.

स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील राष्ट्रीय पंच आणि आंतरराष्ट्रीय पदकप्राप्त खेळाडू देवदत्त भोईर तसेच प्रा. नवनाथ गायकर, विनायक कारभारी, सुश्मिता देशमुख, निलेश भोईर आणि रायगडचे राष्ट्रीय पदकप्राप्त खेळाडू माधव पंडित आणि राज्य खेळाडू राहुल गजरमल यांनी पंच म्हणून काम केले, तर सचिन भालेराव, संदीप पाटकर, शरद रविडोन, विठोबा पालव यांनी व्यवस्था सांभाळली.

स्पर्धेत सांघिक विजेतेपद आयर्न मिट जिम (खोपोली) आणि उपविजेतेपद बीवायएफसी (खोपोली) यांनी प्राप्त केले. विजेत्यांना आरटीओ विभाग अधिकारी रवींद्र जाधव व अन्य मान्यवरांच्या हस्ते पदक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे सर्व संचालन अरुण पाटकर यांनी केले.

# भारताच्या दोन खेळाडू डोपिंग टेस्टमध्ये दोषी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

येत्या २८ जुलैपासून इंग्लंडच्या बर्मिंगहॅममध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतातूनदेखील जवळपास २३० खेळाडूंचा सहभाग असलेला चमू बर्मिंगहॅमला जाणार आहे, मात्र पदकांच्या प्रबळ दावेदार असलेल्या दोन महिला खेळाडू उत्तेजक द्रव्य सेवन चाचणीत (डोप टेस्ट) दोषी आढळल्या आहेत. त्यामुळे या दोन्ही खेळाडूंना राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

भारतीय चमूचा भाग असलेली धावपटू एस. धनलक्ष्मी आणि तिहेरी उडीमध्ये राष्ट्रीय विक्रम नावावर असलेली ऐश्वर्या बाबू या दोघी उत्तेजक द्रव्य सेवन चाचणीत दोषी आढळल्या आहेत.

# विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत अनिष-रिदमला कांस्यपदक

**चँगवॉन : वृत्तसंस्था**

युवा नेमबाज अनिष भानवाला आणि रिदम सांगवान यांनी 'आयएसएसएफ' नेमबाजी विश्वचषक स्पर्धेतील २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल मिश्र सांघिक गटात कांस्यपदक पटकाविले. भारताच्या या जोडीने चेक प्रजासत्ताकच्या ॲना डेडोव्हा आणि मार्टिन पोधरास्की जोडीला १६-१२ अशा फरकाने नमवले.

अनिष-रिदम या जोडीने विश्वचषक नेमबाजी स्पर्धेतील हे दुसरे पदक पटकावले. यापूर्वी त्यांनी मार्चमध्ये कैरो येथे झालेल्या विश्वचषक स्पर्धेत २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल मिश्र सांघिक गटात सुवर्णपदक जिंकले होते.



२५ मीटर रायफल मिश्र सांघिक गटात विजयवीर सिधू आणि सिमरनप्रीत कौर ब्रार यांना सहाव्या स्थानी समाधान मानावे लागले. ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स मिश्र सांघिक गटातही भारताच्या दोन जोड्यांचे पदक थोडक्यात हुकले. संजीव राजपूत आणि अंजुम मुदगिलला पाचवे, तर ऐश्वर्य प्रतापसिंह तोमर आणि आशी चौक्सी जोडीला सहावे स्थान मिळाले. या स्पर्धेत भारत १४ पदकांसह (पाच सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कांस्यपदके) अग्रस्थानी कायम आहे.

# व्यायामाबाबत तडजोड नाही; विराटचा फिटनेस फंडा व्हायरल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा आघाडीचा खेळाडू विराट कोहली सध्या खराब फॉर्ममुळे चर्चेत आहे, परंतु असे असूनही त्याने आपल्या शारिरिक तंदुरुस्तीवर याचा परिणाम होऊ दिलेला नाही. त्याचा नवीन इन्स्टाग्राम व्हिडीओ बघितल्यानंतर याची साक्ष पटते.

भारतीय क्रिकेट संघातील फिट खेळाडूंचा विचार केला, तर विराट कोहलीचे नाव कायम अग्रस्थानी येते. त्यासाठी तो प्रचंड मेहनत घेतो. विराटने नुकताच आपल्या इन्स्टाग्रामवर व्यायाम करतानाचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. 'हे बऱ्याच काळापासून प्रलंबित होते, पण मला वाटते अजूनही उशीर झालेला नाही', अशा कॅप्शनसह त्याने हा व्हिडीओ शेअर केला आहे. त्यामध्ये तो डान्सच्या माध्यमातून व्यायाम करताना दिसत आहे. त्याचा हा व्हिडीओ चाहत्यांना खूप आवडला असून तो व्हायरल झाला आहे.

विराट कोहली इन्स्टाग्रामवर खूप लोकप्रिय आहे. त्यामुळे त्याने व्हिडीओ शेअर करताच चाहत्यांनी त्यावर लाईक्सचा पाऊस पाडला. व्हिडीओ शेअर करून विराट कोहलीने दाखवून दिले आहे की, तो क्रिकेट खेळत असो वा नसो, फिटनेसबाबत कधीही तडजोड करत नाही.

दरम्यान, २२ जुलैपासून सुरू होणाऱ्या वेस्ट इंडीज दौऱ्यात विराट कोहलीला विश्रांती देण्यात आली आहे. या काळात तो पत्नी आणि मुलीसह लंडनमध्ये राहणार असल्याची चर्चा माध्यमांमध्ये रंगली आहे.

# आफ्रिकेतील टी-२० लीग टीम लिलावात आयपीएल फ्रेंचायजींचे वर्चस्व

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

क्रिकेट दक्षिण आफ्रिका पुढच्या वर्षी एक नवी टी-२० लीग सुरू करणार आहे. या लीगसाठीच्या सहा संघाची लिलाव प्रक्रिया नुकतीच झाली. या लिलाव प्रक्रियेत आयपीएलच्या फ्रेंचायजींनी वर्चस्व राखत सर्व सहा संघांवर आपली मोहर उमटवली आहे. त्यामुळे सोशल मीडियावर दक्षिण आफ्रिकेच्या या लीगला आयपीएल म्हणूनच संबोधले जात आहे.

**संघ व संघमालक**

केपटाऊन फ्रेंचायजी (मुंबई इंडियन्सचे मालक), जोहान्सबर्ग फ्रेंचायजी (सीएसकेचे मालक), डर्बन फ्रेंचायजी (लखनौ सुपरजायंटचे मालक), प्रिटोरिया फ्रेंचायजी (दिल्ली कॅपिटल्सचे मालक), पार्ल फ्रेंचायजी (राजस्थान रॉयल्स मालक), पोर्ट एलिझाबेथ फ्रेंचायजी (सनराईजर्स हैदराबादचे मालक). दक्षिण आफ्रिका क्रिकेटचे निर्देशक आणि माजी कर्णधार ग्रॅम स्मिथने या सर्व फ्रेंचायजींचे अभिनंदन केले.


## श्री. प्रमोद म्हात्रे यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन




रयत शिक्षण संस्थेमध्ये सलग ३९ वर्षे अध्यापन करणारे, आदिवासी संस्थेमार्फत आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झालेले, तसेच इंटरनॅशनल ह्युमन राईट्स कौन्सिलतर्फे **'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक'** पुरस्काराने सन्मानित झालेले श्री. प्रमोद म्हात्रे (आवरे-पनवेल) यांचा ६०वा वाढदिवस मोठ्या धूमधडाक्यात दिनांक १९ जुलै २०२२ रोजी उरणनाका येथील क्राऊन प्लाझा या हॉलमध्ये साजरा करण्यात आला.

सदर प्रसंगी त्यांचे नातेवाईक, मित्रमंडळी उपस्थित होते. त्या ६०व्या वर्षानिमित्ताने ६० पणत्यांनी त्यांना औक्षण करण्यात आले. विविध करमणुकीच्या कार्यक्रमाचे (गीते, मनोरंजनात्मक खेळ तसेच कौटुंबिक डान्स) याचे आयोजन करण्यात आले होते. खेळेमेळीच्या आनंदी वातावरणात सदर कार्यक्रम संपन्न झाला. शेवटी स्नेहभोजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन त्यांची तीन मुले आणि सून यांनी केले होते.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com